# सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर बुधवार, दि. १२ मार्च २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३४६ | पाने : ८ | किंमत रु. ६/-

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मॉरिशसमध्ये भव्य स्वागत

पोर्ट लुईस : पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या मॉरिशस दौऱ्यावर आहेत.जिथे ते १२ मार्च रोजी मॉरिशसच्या राष्ट्रीय दिनाच्या समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. या समारंभात भारतीय नौदलाच्या जहाजासह भारतीय संरक्षण दलांचा एक तुकडा सहभागी होईल. पंतप्रधान मोदी त्यांच्या भेटीदरम्यान क्षमता निर्माण, व्यापार आणि सीमापार आर्थिक गुन्ह्यांचा सामना करण्याच्या क्षेत्रात भारत आणि मॉरिशसमधील सहकार्यासाठी अनेक करारांवर स्वाक्षरी करतील. पंतप्रधान मोदी मॉरिशसला पोहोचले असून मॉरिशसमधील उच्चपदस्थ व्यक्तींनी पंतप्रधानांचे भव्य स्वागत केले.



पंतप्रधान मोदींच्या स्वागतासाठी खासदार, आमदार, राजनैतिक दल आणि धार्मिक नेत्यांसह एकूण २०० मान्यवर उपस्थित होते. मॉरिशसचे पंतप्रधान नवीन रामगुलाम यांनी पंतप्रधान मोदींना पुष्पहार अर्पण केला. त्यांच्यासोबत उपपंतप्रधान, मॉरिशसचे मुख्य न्यायाधीश, राष्ट्रीय असेंब्लीचे अध्यक्ष, विरोधी पक्षनेते, परराष्ट्र मंत्री, कॅबिनेट सचिव, ग्रँड पोर्ट जिल्हा परिषदेचे अध्यक्ष आणि इतर अनेक जण होते.तसेच मॉरिशसमधील भारतीय प्रवासी समुदायाचे सदस्य पोर्ट लुईसमधील हॉटेलबाहेर जमले होते. भारतीय प्रवासी समुदायाचे सदस्य शरद बरनवाल म्हणाले, 'आम्ही सर्वजण खूप उत्साहित आहोत. आम्ही सकाळपासून इथे जमलो आहोत.भारत आणि मॉरिशसमधील मैत्री नेहमीच चांगली राहिली आहे आणि पंतप्रधान मोदींच्या या भेटीनंतर हे नाते आणखी मजबूत होईल.

## ४,२०,००० कोटींच्या कंपनीची सूत्रे सांभाळणारी भारतातील सर्वात श्रीमंत महिला



मुंबई : भारतातील उद्योजक मुकेश अंबानी आणि गौतम अदानी यांच्यानंतर आता तिसऱ्या क्रमांकाची श्रीमंत व्यक्ती म्हणून एक महिला पुढे येणार आहे. ही महिला म्हणजे रोशनी नादर मल्होत्रा. एचसीएल टेकचे संस्थापक शिव नादर यांनी आपल्या कन्येला ४७ टक्के हिस्सा हस्तांतरित केल्यानंतर रोशनी आता भारतातील सर्वात श्रीमंत महिला ठरणार आहे. शिव नादर यांनी त्यांच्या उत्तराधिकार योजनेअंतर्गत एचसीएल कॉर्पोरेशन आणि वामा दिल्ली या प्रमोटर कंपन्यांमधील ४७ टक्के हिस्सा 'गिफ्ट डीड'च्या माध्यमातून रोशनी नादर मल्होत्राला दिला आहे. या हस्तांतरणामुळे रोशनी या कंपन्यांमध्ये बहुमत मिळवणार आहेत, ज्यामुळे त्या एचसीएल इन्फोसिस्टम्स आणि एचसीएल टेक मधील सर्वात मोठ्या शेअरहोल्डर बनतील.

# इलॉन मस्क यांना धक्का; टेस्ला शेअर्समध्ये मोठी घसरण

वॉशिंगटन डीसी : टेस्ला कंपनीचे प्रमुख इलॉन मस्क यांना गेल्या २४ तासांत मोठा फटका बसला आहे. काही काळापासून इलॉन मस्क यांच्या टेस्ला शेअर्समध्ये मोठी घसरण होत आहे. यामुळे मस्क यांची नेटवर्थ २.५ लाख कोटी रुपयांनी कमी झाली आहे. दुसरीकडे, त्यांची कंपनी एक्स (ट्विटर) देखील तांत्रिक अडचणींचा सामना करत आहे.

शेवटच्या व्यवहाराच्या दिवशी यूएस स्टॉक मार्केटमध्ये मोठी घसरण झाली आणि त्यादरम्यान इलॉन मस्कच्या इलेक्ट्रिक कार कंपनी टेस्लाचे





शेअर्सदेखील क्रॅश झाले.हा शेअर १५.४३ टक्के घसरुन २२२.१५ डॉलरवर आला. गेल्या वर्षी डिसेंबर पासून टेस्लाच्या शेअरची किंमत आता ५३ % घसरली आहे. टेस्लाच्या शेअरमध्ये झालेल्या मोठ्या घसरणीमुळे नॅस्डॅक निर्देशांक देखील ४ टक्क्यांनी घसरला.गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात टेस्लाच्या शेअर्सने तुफानी वाढीसह ४८८.५४ प्रति शेअर हा सर्वकालीन उच्चांक गाठला होता. टेस्लाच्या शेअर क्रॅशचा परिणाम इलॉन मस्क यांच्या नेटवर्थवरही दिसून आला. गेल्या २४ तासांत इलॉन मस्कची एकूण संपत्ती २९ अब्ज डॉलर्स कमी झाली असून, आता ३०१ अब्ज डॉलर्सवर आली आहे. या वर्षात आतापर्यंत मस्कच्या संपत्तीत १३२ अब्ज डॉलर्सची घट झाली आहे.

इलॉन मस्क यांचे टेस्लाचा शेअर सोबतचं मायक्रोब्लॉगिंग कंपनी ट्विटर (आता एक्स) देखील अडचणींचा सामना करत आहे. सोमवारी(दि. १०) एक्स प्लॅटफॉर्म दिवसभरात तीनदा क्रॅश झाले, ज्यामुळे जगात खळबळ उडाली. याचा सर्व्हर यापूर्वीही अनेकदा डाउन झाला आहे, मात्र एकाच दिवसात तीनदा डाऊन होण्याची ही पहिलीच घटना आहे.

# इंडसइंड बँकेच्या शेअर्समध्ये २० टक्क्यांची घसरण

नवी दिल्ली : कालपासून टेस्लाच्या शेअरमध्ये होणाऱ्या घसरणीमुळे गुंतवणूकदारांना मोठा धक्का बसला आहे. यातच आता इंडसइंड बँकेच्या शेअर्सचाही समावेश झाला आहे. आजचा भारतीय व्यवहार सुरु होताच सेन्सेक्स आणि निफ्टी कोसळले आहे. यामध्ये खासगी क्षेत्रातील इंडसइंड बँकेच्या शेअर्समध्ये सर्वात मोठी घसरण झाली. त्यामुळे खासगी क्षेत्रातील दिग्गज इंडसइंड बँकेला मोठा झटका बसला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, इंडसइंड बँकेच्या शेअरची किंमत आजच्या व्यवहाराच्या सुरुवातीलाच २० टक्क्यांनी





घसरली. यामुळे आता इंडसइंड बँकेचा शेअर ७२०.३५ रुपयांवर पोहोचला आहे. याबाबत बँकेला मिळालेल्या अहवालानुसार डिसेंबर २०२४ पर्यंत तिच्या निव्वळ संपत्तीवर सुमारे २.३५% च्या प्रतिकूल परिणामाचा अंदाज व्यक्त केला होता. तर स्टॉकमधील ही घसरण मार्च २०२० नंतरची सर्वाधिक होती.

शेअरचे डाउनग्रेड

इंडसइंड बँकेच्या शेअर्सवर आज मोठ्या प्रमाणात विक्रीचा दबाव आला. खासगी बँकेच्या डेरिव्हेटिव्ह्ज पोर्टफोलिओमध्ये मोठ्या प्रमाणात विसंगती झाल्यामुळे कमकुवत कमाईच्या दृष्टीकोनातून विश्लेषकांनी डाउनग्रेड केले. बाजारातील विश्लेषकांनी बँकेतील सततच्या नकारात्मक घडामोडींमुळे आणि कर्जदात्याच्या विश्वासार्हतेला धक्का ण्याची भीती व्यक्ती केली आहे. तसेच स्टॉक 'होल्ड' वरून 'रिड्यूस' वर खाली आणला आहे.

आजचा सेन्सेक्स कोसळला

मंगळवारी शेअर बाजाराची सुरुवात खूपच खराब झाली. बीएसई सेन्सेक्स ७४,११५.१७ च्या आधीच्या बंदच्या तुलनेत ७३,७४३.८८ वर उघडला आणि काही मिनिटांतच तो ४०० हून अधिक अंकांनी घसरला आणि ७३,६७२ च्या पातळीवर घसरला. दुसरीकडे, एनएसईचा निफ्टी निर्देशांक (एनएसई निफ्टी) देखील सेन्सेक्सच्या पावलावर चालताना दिसत आहे. सोमवारच्या २२,४६०.३० च्या बंदच्या तुलनेत ते २२,३४५.९५ वर उघडले आणि काही मिनिटांत १३० हून अधिक अंकांनी घसरून २२,३१४ च्या पातळीवर व्यवहार करताना दिसले.

## एप्रिल, मे महिन्यामध्ये उष्णतेची लाट येण्याची शक्यता

सोलापूर : सध्या वातावरणात होत असलेल्या चढउतारामुळे सर्दी, खोकला, ताप, अंगदुखी, घसा दुखी, हात-पाय दुखणे अशा रुग्णांच्या संख्येत वाढ होताना दिसत आहे. सध्या पहाटेच्या वेळी काही प्रमाणात गारठा तर सकाळी दहाच्या पुढे उन्हाचा जबरदस्त चटका वाढत आहे. मार्च महिन्याच्या सुरवातीलाच तापमानाने ३६ अंशांचा पल्ला गाठला आहे. अशा विरोधी वातावरणाचा सर्वाधिक फटका लहान बालकांना होत असून त्यांना उलट्या, जुलाब यांचाही त्रास होत आहे.

## शेतकऱ्याकडून वीस हजार रुपयाची लाच घेताना महावितरण कनिष्ठ अभियंत्यास अटक

बिडकीन दि ११ मार्च पैठण तालुक्यातील बिडकीन येथील कनिष्ठ अभियंता वर्ग ३ नेमणूक महावितरण कार्यालय बिडकीन उपविभागीय तालुका पैठण जिल्हा छत्रपती संभाजीनगर यास शेतकऱ्याकडून वीस हजार रुपयाची लाज घेताना केले अटक, सविस्तर माहिती अशी की शेतकरी तक्रारदार यांचे मौजे टाकळी तालुका पैठण शिवार शेतातील पाच संच सौर पंपाचे मंजुरी अर्ज करुन त्याबाबत शासकीय फीस भरली होती त्यानंतर महावितरण कार्यालयाचे मंजुरी देण्याकरिता आलोसे महेश काशिनाथ घावट वय ३५ वर्षं कनिष्ठ अभियंता महावितरण कार्यालय बिडकीन यांनी तक्रारदार यांच्याकडे पंचा समक्ष २५,००००, रुपयाची मागणी करुन तडजोडी अंती २०,००० रुपये स्वीकारण्याचे मान्य केले, महावितरण कार्यालय समोरील रसवंती समोर रोडवर लाचेची रक्कम पंचासमक्ष स्वतः स्वीकारले असता त्यांना लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेण्यात आले असून, बिडकीन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील कारवाई पोलिस अधिक्षक संदीप आटोळे, पोलिस निरीक्षक केशव दिंडे,मुकुंद अघाव अपर पोलीस अधीक्षक, यांच्या मार्गदर्शनाखाली नागरगोजे,आत्माराम पैठणकर, वाहन चालक ताटे यांनी कारवाई केली.

## भारत जगातील ५व्या क्रमांकाचा प्रदूषित देश

नवी दिल्ली : भारतामध्ये वाढते वायू प्रदूषण आता जागतिक स्तरावर चिंतेचा विषय बनले आहे. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या ग्लोबल पॉल्युशन रिपोर्ट २०२४ नुसार, जगातील २० सर्वाधिक प्रदूषित शहरांपैकी १३ शहरे भारतातील आहेत. ही एक गंभीर बाब असून त्यामुळे भारतीय जनतेच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. विशेष म्हणजे, या यादीत भारताची राजधानी दिल्ली अजूनही जगातील सर्वाधिक प्रदूषित राजधानी असल्याचे स्पष्ट झाले आहे. स्विस एअर क्वालिटी टेक्नॉलॉजी कंपनी IQAir ने २०२४ साठी जागतिक एअर क्वालिटी अहवाल प्रसिद्ध केला आहे.






72198 21111 | BAJAJ SECURE • AMC • ROAD SIDE ASSISTANCE | BAJAJ CREDIT

*Terms and conditions apply. *Offer available on Pulsar 125 Carbon Fibre and Pulsar 150 models. #Ex Showroom price for N160 Twin Disc variant. *Down payment for Pulsar 125 Carbon Fibre. Bajaj Auto reserves the right to withdraw any or all offers without prior notice. Stunts have been performed by experts, under professional supervision, in a controlled and enclosed environment, in isolation from general public or public roads. Do not attempt to replicate these stunts and always follow traffic and safety rules. AMC available on specific models and in specific states. Check with Bajaj dealer for more details. Roadside Assistance is provided by third parties and is subject to their terms and conditions.

**Authorized Dealers for Bajaj Auto Ltd.:** Aurangabad • Adalat Road PAGARIYA BAJAJ 02406659937 • AkashPusad PAGARIYA BAJAJ 7709366111 • Harsul Point PAGARIYA BAJAJ 7709366111 • Waluj PAGARIYA BAJAJ 6616734 Bhokardan Road Sillod ASHOK BAJAJ 8380001965 • Shendra ASHOK BAJAJ 8380025694 • Buldhana ASHOK BAJAJ • Jamkhed Navale Bajaj 9130609999 8929643158• Jalna AMBRISH BAJAJ 8605466906• Ahmednagar Kinetic Chowk Chhatrapati Bajaj 9175142881, • Ahmednagar Savedi Naka Chhatrapati Bajaj 8087203861 • Kopargaon Shirode Bajaj 9921009952, • Rahuri Shirode Bajaj 9921009953 • Shrirampur Shirode Bajaj 9270468998 • Sangamner MALPANI BAJAJ 9850112036, 02425-2225031 • **Authorised Service Centre:** Paithan 9850823363, Bidkin 9881341213, Vaijapur 9422854982, Lasur 7276183895, Gangapur 9423940806, Shivoor 9850709785, Mahalgaon 9284755116, Soygaon 8956111154, Phulambri 7588075675, Karmad 9881159432, , Pishore 9130646246 Bhokardan 9923485831, Georai 8698568509, Majalgaon 9422380842, Kaij 9423715751, Ambajogai 9607091874, Patoda 9423471895, Ashti 7840900444, Ambad 9834910719, Rajur 8275333360, ,Walsawangi 8275855491, Partur 9112649438 , Ausa 8149542017 Murud 9860351229, Chakur 9049746161, Renapur 9881951011, Omerga 9890521818, Paranda 9421212280, Kinwat 9527257525, Mukhed 9579194868 , Umri 8149815921, Narsi 9860069635 Bhokar 9423139732, Mahur 96089073034 ,Malegaon 9403746580,Vasmat 9890173708, Sengaon 9762427999, Jawala Bazar 9890989138, Pathri 9860907003, Palam 9763385151, Selu 7499441540, Gangakhed 9421859114, Ranisawargaon 8668727630. Khamgaon 9921479013, Rashin 9975704778, Mirajgaon 7774826060 Akole 9881939099, Alephata 7507571715, Ashwi 8888201059, Ghargaon 9970302801,Manchar 9890014697, Narayangaon 9850112036, Sakur 9422146709, Talegaon Dighe 9970886986, Nighoj 9850224992, Kotul 9921583946, Ottur 8007000790, Shevgaon 9067893709, Loni 7709387085, Ghodegaon 7588030777, Sonai 7588603005, Newasa 9527554555, Kukana 7588079959.

# महानगरपालिकेचे अग्निशमन दलच्या उपस्थितीमध्ये एका नागरिकाने टाकला आपला जीव धोक्यात

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

महानगरपालिकेचे अग्निशमन दल च्या उपस्थितीमध्ये एका नागरिकाने आपला जीव धोक्यात टाकत एका कबूतर प्राणी ला ४० फूट उंच विजेच्या खांबावर चढत आपला जीव धोक्यात टाकला आणि महानगरपालिकेचे अग्निशमन दलाचे अधिकारी माधव पानपट्टी हे नुसते बघ्याची भूमिका घेत होते त्या मुलाला कोणत्याही प्रकारची सेफ्टी सुरक्षा



नसताना अधिकाऱ्यांसमोर तो



खांबावर चढला आणि अधिकारी अग्निशमन दलाचे माधव पानपट्टी आणि त्यांच्यासोबत कर्मचारी आणि त्याला रोखण्याचे कोणतेही प्रयत्न केले नाही जर या मुलाला जीवितहानी झाली असती तर याच जबाबदार अधिकारी कोण माधव पानपट्टे ही आपली जबाबदारी घेणार का काही दुर्घटना घडल्यास स्वतःची जबाबदारी दुसऱ्यावर टाकून नुसते आपली पगार घेणे हे त्यांचे भूमिका आहे का असे कामचोर अधिकाऱ्याची जालना महानगरपालिका हकालपट्टी करणार का? जालना येथील सिंधी बाजार येथे एका ४० फूट उंचीवर चढून आणि आपला जीव धोक्यात टाकला होता. मा जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ साहेब आपण अग्निशमन दलाचे माधव पानपट्टे कामचोर अधिकाऱ्याची चौकशी करणार का यांनी नुसती बघ्याची भूमिका घेतली आणि एका मुलाचा जीव धोक्यात टाकला या कामचोर अधिकाऱ्याची चौकशी करण्याची मागणी जालना शहराचे नागरिक करीत आहे

## महिला दिनानिमित्त शेती अवजारे विकणाऱ्या महिलांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

दिनांक ८ मार्च २०२५ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त महात्मा फुले पंथ विक्रेता संघटना तर्फे मामा चौक जालना येथील शेतीचे अवजारे विकणाऱ्या घिसडी समाजाच्या गोरगरीब महिलांच्या सत्कार मा.अर्जुनभाऊ खोतकर यांच्या हस्ते करण्यात आला होता. यावेळेस शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर, जिल्हा प्रमुख भाऊसाहेब घुगे,शहर प्रमुख विष्णू पाचफुले कॉ.सगीर अहमद, कमलेश खैरे, नरेश खुदभैय्य, मेघाराज चौधरी, प्रकाश घोडे पाटील ,बाबा भाई कुरेशी, इत्यादीची उपस्थित होते.

## संक्षिप्त

### जालना जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा जगदीश मिनियार यांनी स्विकाराला कार्यभार



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना जिल्हा परिषदेचे नवनियुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जगदीश मिनियार यांनी आज पदाचा कार्यभार स्विकारला. कार्यभार स्विकारल्या नंतर त्यांनी जिल्हा परिषदेतील सर्व विभागांचा आढावा घेतला.

श्री. मिनियार हे मुळचे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील असून, त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण देवगिरी महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर आणि वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथे झाले. श्री. मिनियार यांच्या प्रशासकीय सेवेची सुरुवात सन १९९१ मध्ये तहसीलदार परभणी या पदापासून झाली. परिविक्षा कालावधीनंतर तहसीलदार कळंब, जिल्हा धाराशिव व त्यानंतर तहसीलदार अहमदपूर, जिल्हा लातूर येथे काम केले. त्यानंतर पद–ोन्नतीने उपजिल्हाधिकारी रोहयो परभणी, उपविभागीय अधिकारी हिंगोली, निवासी उपजिल्हाधिकारी हिंगोली, निवासी उपजिल्हाधिकारी जालना, उपजिल्हा निवडणूक अधिकारी नांदेड, उपजिल्हाधिकारी रोहयो नांदेड, उपविभागीय अधिकारी नांदेड, त्यानंतर सहाय्यक आयुक्त, नरेगा नागपुर येथे काम केले.

त्यानंतर पदोन्नतीने अपर जिल्हाधिकारी झाल्यानंतर काही काळ पुणे येथे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, त्यानंतर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ अंतर्गत समृद्धी महामार्ग करिता समन्वयक त्यानंतर अपर जिल्हाधिकारी, हिंगोली पदावर काम केले. त्यानंतर पदोन्नतीने विभागीय अप्पर आयुक्त (सामान्य प्रशासन) या पदावर छत्रपती संभाजीनगर येथे काम केले.

नुकतीच त्यांची नागरी सेवेतील अधिकारी म्हणून पदोन्नतीने भारतीय प्रशासन सेवेत पदोन्नती झाली आहे. ३३ वर्षाच्या कार्यकाळात श्री. मिनियार यांनी विविध ठिकाणी विविध प्रकारची कामे केली असुन, त्यांना दीर्घ प्रशासकीय कामाचा अनुभव आहे. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे नांदेड येथील गुरुतागद्दी कार्यक्रमात त्यांचा महत्त्वाचा सहभाग होता. तसेच नरेगा आयुक्तालय नागपूर येथे महात्मा गांधी नरेगा योजनेच्या वाढीसाठी महत्त्वपूर्ण काम केले. हिंगोली जिल्हा निर्माण झाल्यानंतर नवनिर्मित जिल्ह्याच्या प्रशासनाची घडी बसविण्यामध्ये महत्त्वाचा सहभाग होता. कोविड महामारीच्या काळात विभागीय पातळीवरून मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांसाठी ऑक्सिजन पुरवठा, औषधी पुरवठा दवाखान्यांमध्ये आधुनिक सोयी–सुविधा देण्यामध्ये समन्वयक या नात्याने त्यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली होती.

प्रशासनात आतापर्यंत कोणतीही चौकशी झालेली नसून, आतापर्यंत त्यांची संपूर्ण सेवा निर्विवादपणे पार पडली आहे. काम करताना सर्व स्तरातील नागरिक, अधिकारी, लोकप्रतिनिधी तसेच माध्यमाकडून चांगले सहकार्य लाभले असून, याठिकाणी ही जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीकोनातून काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले. आज त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, स्मार्ट सिटी छत्रपती संभाजीनगर येथून बदलीने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जालना या पदाचा त्यांनी कार्यभार स्विकारला आहे.

### वन्यप्राणी खवले मांजर तस्करी प्रकरणात आरोपी अटकेत

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

वन्यप्राणी खवले मांजर तस्करी प्रकरणात आणखीन एका आरोपीला जालना वन विभागाने अटक केलीय. आता पर्यंत एकूण ७ जणांच्या वन विभागाने मुसक्या आवळल्या आहेत. न्यायालयाने या आरोपींना १२ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. दि. ०८/०३/२०२५ प्रथम वर्ग न्यायालय जालना यांनी आरोपी १) संजय उकंडा राठोड, रा. गिरोली ता. मानोरा जि. वाशिम २) सुनिल नामदेव थोरात,, रा. चोंडीता. वसमत जि. हिंगोली ३) नारायण पुजाराम अवचार, रा. विडोळी ता. मंठा जि. जालना ४) प्रताप गुलाबराव सरनाईक, रा. हिवरा ता. रिसोड ५) अनिल अशोक सावळे, रा. ढोरखेडा ता. मालेगाव ६) एकनाथ अनिल इंगोले, रा. लाखाला ता.जि. वाशिम आरोपींना दि. १०/०३/२०२५ पर्यंत वनकोठडी सुनावण्यात आली होती. सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो व वन्यजीव) जालना यांच्या नेतृत्व–ाखालील ०३ टिम तयार करण्यात आली होती. त्यामध्ये फरार आरोपी अय्युब खान मिरदाद खान, रा. गिरोली ता. मानोरा जि. वाशिम याचा शोध लागला असुन आरोपीच्या जबाबावरुन त्यांनी सांगितल्या नुसार त्यांच्या राहत्या घरापासुन पुर्व दिशेला ५० मी. अंतरावर प्रोसोपिस झाडाखाली खवले मांजराला मारुन गाडण्यात आलेली जागा दाखविली. सदर ठिकाणचा मेमोरंडम पंचनामा करण्यात आला व वन्यप्राणी खवले मांजराचे कुजलेले अवशेष खवले, हाडे व कवटी जप्त करण्यात आले. वरील आरोपी ०१ ते ०७ यांना आज दि. १०/०३/२०२३ रोजी मा. प्रथम वर्ग न्यायालय जालना यांनी वरील आरोपी ०१ ते ०७ यांना १२ दिवस न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष अरविंद अण्णा चव्हाण यांना विधान परिषदेवर घ्या

### जालन्याच्या पदाधिकाऱ्यांनी केली अजितदादांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण यांना विधान परिषदेवर घ्या अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी आज दिनांक ११ मार्च रोजी सकाळी ११ वाजता राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे मागणी केली आहे. अरविंद अण्णा चव्हाण यांनी जालना जिल्ह्यात अजित पवार गट राष्ट्रवादी वाढवण्याचे काम हाती घेतले आहे. राष्ट्रवादी पक्ष हा तळागाळापर्यंत पोहोचण्याचे काम केले असल्याने अरविंद अण्णा चव्हाण यांना विधान परिषद वर घ्या अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे मागणी केली आहे . यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष शाह आलम खान, जिल्हा कार्याध्यक्ष चंद्रकांत कारके, प्रदेश सरचिटणीस शकुंतला कदम , माजी जिल्हा परिषद सदस्य लक्ष्मण दळवी, जिल्हा उपाध्यक्ष भाऊसाहेब गोरे जिल्हा उपाध्यक्ष अण्णासाहेब चित्तेकर, जालना शहर कार्याध्यक्ष मिर्झा अन्वर बेग, धैर्यशील चव्हाण , राष्ट्रवादी काँग्रेस बदनापुर तालुका अध्यक्ष कैलास मदन, परतुर तालुकाध्यक्ष विठ्ठल बरकुले, अंबड तालुका अध्यक्ष सतीश ढवळे, जाफराबाद तालुकाध्यक्ष दत्तू अंभोरे, भोकरदन तालुकाध्यक्ष सुरेश सपाटे, मंठा तालुकाध्यक्ष गणेश घारे ,जालना तालुकाध्यक्ष संतोष ढेंगळे, सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर घेवंदे, कामगार आघाडीचे मराठवाडा कार्याध्यक्ष सतीश वाहुळे , आघाडी च्या जिल्हाध्यक्ष कांचन शिरभे, युवती जिल्हाध्यक्ष शितल बारोटे , महिला जालना शहराध्यक्ष रिंकल तायड, विजय सोनवणे कृष्णा गाडेकर ज्ञानेश्वर कदम, किशोर सवडे, विलास भावले, अमोल खरात, संदीप गाडेकर श्रीराम पोटरे विठ्ठल मोहिते माणिकराव वायाळ यांच्यासह जालना जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती

## शासनाच्या लोककल्याणकारी योजनाची प्रचाररथाच्या माध्यमातून प्रचार, प्रसिध्दी

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



शासनाच्या विविध कल्याणकारी सर्वसाधारण योजना व सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांची माहिती जिल्ह्यातील लाभार्थ्यांना व्हावी यासाठी जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना व अनुसूचित जाती उपयोजना सन २०२४–२५ अंतर्गत जिल्हा माहिती कार्यालयाने तयार केलेल्या प्रचाररथाला आज प्रभारी जिल्हाधिकारी रिता मैत्रवार यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून मार्गस्थ करण्यात आला. तसेच शासनाच्या विविध कल्याणकारी सर्वसाधारण योजना व समाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांवर आधारीत भित्तिपत्रिकाचे यावेळी मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी सुनिल सुर्यवंशी, महिला बालविकास विभागाचे एस.जी. कुलकर्णी, जिल्हा माहिती अधिकारी अरुण सुर्यवंशी आदी उपस्थित होते.

या प्रचाररथाच्या माध्यमातून रेशीम शेती उद्योग–शेतकऱ्यांसाठी शाश्वत व सक्षम शेतीचा पर्याय, मॉडेल करिअर सेंटर केंद्र पुरस्कृत योजना, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजना, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ योजना, बालविवाह प्रतिबंध कायदा:२००६, पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावे तसेच सामाजिक न्याय विभाग अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना, रमाई आवास (शहरी व ग्रामीण) घरकुल योजना, अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील मुला/मुलीं–साठी शासकीय निवासी शाळा, राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना, सैनिक शाळेतील अनुसूचित जाती /विजाभज/विमाप्र प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता, अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर, मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता शासकीय वसतीगृहे, कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना, अनुसूचित जातीच्या मुलां–मुलींना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, गटाई कामगारांना पत्र्याचे स्टॉल पुरविणे या योजनांची माहिती प्रचाररथामार्फत लाभार्थ्यां पर्यंत पोहचविण्यात येणार आहे.

## सुभानपुर येथे दोन समाजात जातीय तेढ

### रिपब्लिकन सेनेच्या वतीने पोलीस निरीक्षकांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

तालुक्यातील सुभानपुर येथे नियोजित बौद्ध विहाराच्या जागेवर छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा ठेवण्यात आल्याने दोन समाजात जातीय तेठ निर्माण झाल्या आहे. त्यामुळे झालेल्या घटनेची चौकशी करून दोषीवर कारवाई करण्याची मागणी रिपब्लिकन सेनेच्या वतीने पोलीस निरीक्षकांना निवेदन देण्यात आले. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, भोकरदन तालुक्यातील सुभानपुर येथे नियोजित बौद्ध समाजाच्या जागेवर काही समाजकंटकांनी हेतुपुरस्सर छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारण्यात आला आहे. या घटनेमुळे दोन समाजात तेढ निर्माण होऊन गावात जातिय तेढ निर्माण झाला आहे. त्याच बरोबर हे प्रकरण गेली अनेक दिवसांपासून गावात सुरू आहे. मागील १९ जानेवारी २०२५ रोजी काही समाजकंटकांनी बौद्ध विहाराच्या जागेवर जेसीपीच्या सहाय्याने छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यासाठी भला मोठा खड्डा खोदण्यात आला होता. त्यानुसार गावातील बौद्ध समाजातील नागरिकांनी भोकरदन येथे पोलीस स्टेशनला जाऊन रितसर तक्रार दिली होती. त्यानंतर उपविभागीय अधिकारी डॉ.दयानंद जगताप, तहसीलदार संतोष बनकर, पोलीस निरीक्षक किरण बिडवे, तलाठी सोनवणे, मंडळ अधिकारी तळोकर, ग्रामसेवक झोरे,



त्याचबरोबर नांजा येथील ग्रामसेवक आढावे, बिट अंमलदार टेकाळे या शासकीय अधिकाऱ्यांनी गावात येऊन घटनास्थळी भेट दिली. या खोदलेला खड्डा हा बौद्ध विहाराच्या जागेवर त्यांना दिसून आला. त्यामुळे सर्वानुमते खोदलेला खड्डा दोन्ही समाजाची बैठक घेऊन तात्काळ बुजवण्यात आला होता. खड्डा बुजवण्यात आल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून गावातील सवर्ण लोकांनी ठराव घेतला की, बौद्ध समाजातील लोकांना शेतात काम द्यायचे नाही, तसेच त्यांना दळण दळून द्यायचे नाही, त्याचबरोबर किराणा दुकानातील किराणा सामान देखील देण्यात येऊ नये तसेच सर्व बौद्ध समाजावर अलिखित बहिष्कार टाकण्यात आला होता. ही बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची असून गावातील लोक अत्यंत भयभीतल झाले आहे. तसेच गावातील सवर्ण लोकांकडून जातीवादाचा प्रकार हा मोठ्या प्रमाणात वाढत दिवसेंदिवस वाढत चालला आहे. सुभानपुर गावातील बौद्ध समाजातील महिला,पुरुष वृद्ध, लहान मुले मुली यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे बौद्ध विहाराला व गावतील बौद्ध समाजातील नागरीकांना पोलीस प्रोटेक्शन देण्यात यावे व गावातील बौद्ध समाजातील लोकांचा जातीवादी गावगुंडांपासुन जिव वाचवण्याची मागणी केली आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे आमचे देखील महापुरुष आहे. त्यांच्या पुतळा उभारण्यासाठी आमचा कुठल्याही प्रकारचा विरोध नाही. परंतु ज्याप्रमाणे गावातील सवर्ण वर्गातील लोक जातीय तेढ निर्माण करण्यासाठी वागत आहे. त्यानुसार आमची अशी मागणी आहे की, छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा सन्मानाने योग्य त्या ठिकाणी तो स्थलांतरित करण्यात यावा; अन्यथा हे प्रकरण वाढल्यास संपूर्ण महाराष्ट्रात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. या प्रकरणाकडे प्रशासनाने लक्ष घालावे अशी मागणी केली. या निवेदनावर रिपब्लिकन सेनेचे प्रा.शिलवंत गोपनारायण, डॉ.अरुण शिरसाठ, राहुल खरात, गंगाधर पगारे, राजु खरात, नथ्थु खरात, गंगाधर दाभाडे, ड.मिलिंद बनसोडे, ड.मिलिंद आठवले आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



## पारध बू.येथे भव्य पशूसंवर्धन शिबीर संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**पारध/प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील पारध बू.येथील सामाजिक कार्यकर्ते स्व. प्रतापराजे देशमुख यांच्या १० व्यां पुण्यतिथी निमित्त सोमवारी पारध येथे भव्य पशुसंवर्धन शिबिर पार पडले .यावेळी भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष राजेंद्र देशमुख. माजी पं.स. सभापती परमेश्वर लोखंडे , शिवसेना शिंदे गटाचे तालुकाप्रमुख विशाल गाढे, पत्रकार विशाल अस्वर,माजी चेअरमन संजय कतोरे ,किरण श्रीवास्तव ,सखाराम लोखंडे ,राजू अण्णा पाखरे ,प्रा.साहेबराव लोखंडे ,भा.ज.पा.चे ज्येष्ठ नेते दिलीप बेराड ,राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक समाधान लोखंडे,दिलीप देशमुख यांच्यासह ग्रामस्थ व पशुपालक शेतकऱ्यांनी मोठी गर्दी केली होती . शिबिराला प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉक्टर यू. बी. वानखडे आणि डॉ. राजरत्न वाघमारे यांनी मार्गदर्शन केले सोबतच पशुतज्ञ म्हणून डॉ. राजेश फुके ,डॉ. राजेश पवार, डॉ. पंडित जराड, डॉ. श्रीकृष्ण भगत, डॉ. अमोल लोखंडे, उमेश ताजी आदींनी शिबिराला अनमोल सहकार्य केले. शिबिर यशस्वी पार पाडण्यासाठी राजू अण्णा पाखरे, विशाल लोखंडे ,प्रफुल लोखंडे, शिवा लोखंडे, योगेश देशमुख ,भारत लोखंडे मंगेश देशमुख, संदीप लोखंडे, पांडू लोखंडे चेतन देशमुख,आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष पाखरे यांनी केले , प्रस्ताविक संग्रामराजे देशमुख यांनी केले तर आभार विशाल आस्वार यांनी मानले. या शिबिराचे आयोजन सामाजिक कार्यकर्ते सागर देशमुख यांनी केले होते.

## किर्तापूर येथील दोन सिमेन्ट बंधारे जेसीबीच्या साह्याने उद्धवस्त

### उध्वस्त करण्याचे नेमके कारण काय?; शेतकऱ्यांना प्रश्न पडल्याने शेतकरी धावले जिल्हाधिकाऱ्याकडे

**तभा वृत्तसेवा**
**तळणी/प्रतिनिधी**

तळणी येथून जवळच किर्तापुर गांव आहे. तळणी किंवा मंठा मार्गावरील पेवा पाटी ओलांडुन पुर्वेकडे काही अंतरावर पेवा आणि किर्तापुर चा मधला दुवा म्हणजे हा किर्तापुरचा मोठा ओढा या ओढ्यात काही वर्षा पूर्वी बांधलेले पाणि आडवा पाणि जिरवा या पद्धतीचे लाखो रूपये खर्च करून दोन सिमेंट नाले बंधारे बांधले होते. मात्र दोन तिन दिवसांपुर्वी नेमके त्यांच्या मनात काय होते हे कळु शकले नाही? मात्र अज्ञात व्यक्तीने सदरील सिमेंट नाले बंधारे जमीनदोस्त केल्याची घटना घडली. याबाबत किर्तापुर येथिल जानकार शेतकऱ्यांनी सदरील घटनेचे निवेदन उपविभागीय अधिकारी परतुर व मंठा तहसीलदार यांना देण्यात आले असून



यासंदर्भात सिमेंट बंधारे उध्वस्त करून टाकन्याचा नेमका त्यांचा उद्देश काय होता.हे तपासुन त्या अज्ञातावर गुन्हे दाखल करण्याची मागणी या निवेदनाद्वारे केली आहे गट नंबर २७४ मध्ये असलेल्या ओढ्यावर तीन ते चार वर्षांपूर्वी हे दोन सिमेंट नाले बंधारे बांधण्यात आले होते. अंदाजीत शासनाचा खर्च एका बंधाऱ्यावर ५० लक्ष रुपये झाल्याचे या निवेदनात म्हटले आहे. हे सिमेंट बंधारे काढण्याचे काहीच कारण नसताना कोणाच्या परव–ानगीने हे बंधारे उध्वस्त करण्यात आले हे कळायला मार्ग नाही या बंधाऱ्यात पाणी साठवून शेतकऱ्यांना शेतीसाठी पाण्याचा



मोठा उपयोग होत असतानाच हे बंधारे काढणाऱ्या वर तात्काळ गुन्हे दाखल करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना सिंचनाची व्यवस्था व्हावी व शेतकऱ्यांना सुलभता यावी म्हणून शासन स्तरावर अनेक योजना सिंचनासाठी करण्यात येत असतात तरीसुद्धा कुठलीही कल्पना न देता हे बंधारे का उध्वस्त करण्यात आले हे ग्रामस्थांना कळायला मार्ग नाही? तसेच हे बंधारे काढून त्या जागेवर किंवा त्या जागेच्या समोर पैसा कमवन्याच्या हेतूने नव्याने बंधारा मंजूर करून तो बांधण्याचा घाट काही मंडळींनी घातल्याचे सूत्रांनी सांगितले आहे. त्या ओढ्यावरील सिमेंट बंधारे कोणी काढले हे माहित नाही? परंतु या संपूर्ण प्रकरणाची चौकशी होऊन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी प्रकाश फड यांनी केली आहे. नसता जिल्हाधिकार्यालया समोर अमरण उपोषण करणार असल्याचे प्रकाश फड यांनी सांगितले. या निवेदनावर प्रकाश फड प्रल्हाद काळे, गोविंद काळे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# त्या अपघातातील मयतांच्या वारसांना शासकीय मदत मिळणार



कन्नड :- दि.११ मार्च - सातकुंड तांडा येथील पाच व बेलखेडा येथील एक ऊसतोड कामगार पिशोर वरुन कन्नड कडे येत असतांना ऊसाचा ट्रक पलटी झाला त्यात १. किसन धर्मु राठोड वय ३१ वर्ष, २. कृष्णा मुलचंद राठोड वय ३० वर्ष, ३. मनोज नामदेव चव्हाण वय २५ वर्ष, ४. मिथुन महारु चव्हाण वय २६ वर्ष, सर्व ५. ज्ञानेश्वर देविदास चव्हाण वय ३० वर्ष, राहणार सर्व सातकुंड व ६. विनोद नामदेव राठोड वय ३० वर्ष, राहणार बेलखेडा यांचा मृत्यु झाला व जखमी १. इंदरचंद प्रेमसिंग चव्हाण २. रविंद्र नामदेव राठोड ३. आरती ज्ञानेश्वर चव्हाण ४. राणी लखन राठोड ५. लखन छगन राठोड ६. सागर भागीनाथ राठोड ७. राहुल नामदेव चव्हाण ८. सचिन भागीनाथ राठोड ९. महारु भिका चव्हाण १०. नामदेव भिका चव्हाण ११. अनिता नामदेव चव्हाण हे जखमी झाले असून जखमींवर उपचार चालू आहे.

सदर कुटूंबाचे सांत्वन करुन त्यांना शासकीय मदत मिळावी यासाठी कन्नड उपविभागाचे उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांनी सर्व कुटूंबाची सातकुंड व बेलखेडा येथे भेट घेतली.

समाज कल्याण विभाग, कृषी विभाग, महिला व बालकल्याण विभाग, गट विकास अधिकारी, तहसिल कार्यालय तसेच मुख्यमंत्री मदत निधी या सर्व विभागाच्या योजना लाभार्थी यांना मिळाल्या पाहीजे याबाबत सुचना सर्व विभागाला दिल्या व त्या बाबत आढावा घेण्यासाठी दि.१२ रोजी सकाळी तहसिल कार्यालयात बैठक घेणार आहे, अशी माहिती उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांनी दिली यावेळी तहसिलदार विद्याचरण कडवकर, मंडळ अधिकारी रमेश चव्हाण, ग्राम महसूल अधिकारी श्रीमती कुशोड व इतर कर्मचारी उपस्थित होते.

## एनर्ज राजस्थानमध्ये विस्तारः शाश्वततेला केंद्रस्थानी ठेवून उच्च-गुणवत्तेच्या उपायांमध्ये क्रांती

मुंबई - एनडीटीएच समूहाचा अभिमानी सदस्य असलेला एनर्ज भारतात इंजिन केअरमध्ये क्रांती घडवत आहे. महाराष्ट्र आणि तेलंगणामधील यशस्वी कामकाजानंतर, कंपनीने राजस्थानमध्ये विस्ताराची घोषणा केली आहे, जो तिच्या वाढीच्या धोरणाचा मुख्य केंद्रबिंदू आहे. मार्च २०२५ पर्यंत हा विस्तार पूर्णपणे कार्यान्वित होईल. एनर्जचा विस्तार महाराष्ट्र, तेलंगणा आणि राजस्थानमधील राजधानी शहरे आणि प्रमुख क्षेत्रांना लक्ष्य करतो, उच्च-गुणवत्तेच्या उत्पादनांची वाढती मागणी आणि अनुकूल आर्थिक परिस्थितीचा फायदा घेत त्यांच्या एमबी-मंजूर, जी.ए.टी.यू.व्ही.-प्रमाणित ऑफरिंग्ज सादर करतो. शाश्वततेसाठीची आपली वचनबद्धता कायम ठेवत, एनर्ज तिच्या संपूर्ण श्रेणीमध्ये बायोडिग्रेडेबल पॅकेजिंगचा वापर करते, जे पर्यावरणीय परिणाम कमी करण्यासाठी आणि पर्यावरणपूरक, जबाबदार ब्रँडसाठी ग्राहकांची मागणी पूर्ण करण्यासाठीच्या त्याच्या समर्पणाचे प्रतिबिंब आहे.

## ॲमेझॉन इंडियाची युथ ४ जॉब्ससोबत भागीदारी

छत्रपती संभाजीनगर : भारतातील दिव्यांग तरुणांना गरिबीमुक्त जीवन जगण्यास मदत करणाऱ्या युथ४जॉब्स फाउंडेशनसोबत ॲमेझॉन इंडिया भागीदारी करत आहे. ॲमेझॉन डॉट इन च्या माध्यमातून दिव्यांग महिला विक्रेत्यांना त्यांचा व्यवसाय ऑनलाइन वाढवण्यासाठी मदत करणे हे यामागील उद्दिष्ट आहे. ॲमेझॉन सहेली कार्यक्रमाद्वारे, ते प्रतिभावान दिव्यांग महिला आणि व्यापक बाजारपेठेत उपलब्ध संधींमधील दरी भरून काढतील. जेणेकरून त्या डिजिटल अर्थव्यवस्थेत आपले पाय भक्कमपणे रोवून उभे राहतील.भारतातील महिला उद्योजक आणि स्थानिक महिलांच्या मालकीच्या व्यवसायांकडून स्थानिक पातळीवर बनवलेल्या उत्पादनांबाबत जागरूकता आणि त्याची व्यापक प्रमाणावर माहिती होण्यासाठी ॲमेझॉन सहेली कार्यक्रम २०१७ मध्ये सुरू करण्यात आला. या भागीदारीद्वारे, ॲमेझॉन कार्यशाळा आयोजित करेल आणि या महिला विक्रेत्यांना ऑनबोर्डिंग माहिती तसेच अकाउंट व्यवस्थापनाची माहिती देतील.

## साक्षी सादर करते: कंट्रोल + अल्टर + डिलिट - कथा पुनर्लेखन कला, संवाद आणि कृतीचा परिवर्तनकारी संगम

मुंबई : कंट्रोल + अल्टर + डिलिट - कथा पुनर्लेखन हा तीन दिवसांचा एक शक्तिशाली संगम आहे जो नंतरच्यासाठी डिझाइन केलेला आहे. साक्षीने आयोजित केलेली ही चळवळ कथाकथन, कला आणि वकिलीच्या शक्तीचा वापर हानिकारक नियमांना नष्ट करण्यासाठी, वाचलेल्यांचे आवाज वाढविण्यासाठी आणि अधिक न्याय्य आणि समतापूर्ण जगाची पुनर्कल्पना करण्यासाठी करते. हा कार्यक्रम कलाकार, कार्यकर्ते आणि बदल घडवणाऱ्यांना एकत्र आणून लिंग न्याय, बाल संरक्षण आणि सर्जनशील वकिलीचे छेदनबिंदू एक्सप्लोर करेल. तल्लीन करणारे नाट्य, बोललेले शब्द सादरीकरण आणि गंभीर पॅनेल चर्चांद्वारे, कंट्रोल + अल्टर + डिलिट- कथा पुनर्लेखन लिंग-आधारित हिंसाचार आणि त्याला सक्षम करणाऱ्या सामाजिक संरचनांवर आवश्यक संभाषणांसाठी जागा तयार करेल. संगम १३ मार्च रोजी बेखौफ बातें ५.० - अपोलोजेटिक एक्सप्रेशन्सने सुरू होईल, ही एक संध्याकाळ आहे जिथे कलाकार कथा पुन्हा मिळवण्यासाठी आणि खोलवर रुजलेल्या रूढींना आव्हान देण्यासाठी मंचावर येतात. कविता, एकपात्री प्रयोग आणि सादरीकरण कला यांच्या माध्यमातून, हा कार्यक्रम वेदनांना प्रगतीत रूपांतरित करणारे आवाज वाढवतो. निवेदिता चंद्रा, पार्थ वासानी, अदिती सुराणा, हर्षा अग्रवाल, विदुशी चड्ढा आणि बरेच काही यांचा समावेश आहे.१५ मार्च रोजी, 'आर्ट दॅट डेअर्स टू स्पीक' वर लक्ष केंद्रित केले जाईल, हा दिवस रंगमंच, तल्लीन करणारी प्रतिष्ठापने आणि तज्ञांच्या नेतृत्वाखालील पॅनेल चर्चांद्वारे बाल लैंगिक शोषणाचा शोध घेण्यासाठी समर्पित आहे. दिवसाची सुरुवात पद्मा दामोदरन यांच्या विचारप्रवर्तक प्रतिष्ठापने 'खिलौना' ने होते जी पिढ्यांमध्ये झालेल्या आघाताचा दीर्घकालीन परिणाम प्रकट करते. पहिला पॅनेल, 'लेयर्स ऑफ हार्म: अनपॅकिंग द इम्पॅक्ट ऑफ चाइल्ड सेक्शुअल अब्युज', बाल सुरक्षा, मानसिक आरोग्य आणि कायदेशीर वकिलीतील आघाडीच्या आवाजांना एकत्र आणून अत्याचार कायम ठेवणाऱ्या संरचनात्मक अडथळ्यांवर चर्चा करते.


### कार्यालय नगरपरिषद हिंगोली जि. हिंगोली

फोन नं. (02456)221727 E-mail:-mchhingoli@gmail.com
विभाग : विद्युत विभाग, जा.क्र. नपहि/३८२/२०२४-२५ दिनांक : १०/०३/२०२५

**ई-निविदा कार्यप्रणाली अंतर्गत निविदा सन २०२४-२५**

मुख्याधिकारी, नगरपरिषद, हिंगोली (दुरध्वनी क्रमांक २४५६-२२१७२७) ई-मेल coud.hingoli@maharashata.gov.in या संकेतस्थळावर Distribution system 90mm HDPE pipe line L=380M at Samajkalyan Office, Hingoli काम करण्यासाठी ई-निविदा प्रणालीद्वारे E-Tendering पध्दतीने ईपीएफ पंजीकृत अनुभवी गुत्तेदार यांच्याकडुन ई-निविदा दिनांक १२/०३/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजले पासुन ते दिनांक २०/०३/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यत उपलब्ध आहेत. प्राप्त ई-निविदा दिनांक २१/०३/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजल्यानंतर उघडण्यात येतील.

ई-निविदा विषयी तपशील महाराष्ट्र शासनाच्या E-Tendering, पोर्टलवर व हिंगोली नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागामध्ये कार्यालयीन वेळेमध्ये पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

(अरविंद मुंढे)
मुख्याधिकारी
नगर परिषद, हिंगोली


# विद्या भोरजारे यांच्या 'कांची' कादंबरीचे प्रकाशन संपन्न



तभा वृत्तसेवा

नागपूर : लेखिका विद्या भोरजारे यांनी लिहिलेल्या 'कांची' या कादंबरीचे प्रकाशन मोर हिन्दी भवनातील नटराज सभागृहात डॉ. धनराज डाहाट यांच्या अध्यक्षतेखाली आंबेडकरवादी लेखक, समीक्षक डॉ. प्रकाश खरात यांच्या हस्ते संपन्न झाले. प्रकाशन समारोहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीचे सदस्य सचिव डॉ. प्रदीप आगलावे प्रमुख अतिथी होते.

'कांची' ही कादंबरी लिहिण्यामागचे प्रयोजन स्वतः लेखिका विद्या भोरजारे यांनी विशद केले. ही कादंबरी लिहिण्याआधी त्यांनी यशोधरा', 'हे कोण शिल्पकार', आणि 'कांची' या कादंबरी पर्यंत कसा प्रवास झाला यासंबंधीचे मनोगत व्यक्त केले आणि ही कादंबरी प्रकाशित करण्यासाठी ज्यांचे ज्यांचे सहकार्य लाभले त्यांच्याही सहकार्याचा विनम्रपणे उल्लेख केला, या कादंबरीला लोकशाहीर संभाजी भगत यांची प्रस्तावना लाभली, त्याचा विशेष उल्लेख केला. ही कादंबरी कोणत्या जाणीवेतून करण्यात आली याचा उलगडा समीक्षकांनी करावा, अशीही आशा त्यांनी व्यक्त केली.

'कांची' या कादंबरीवर भाष्य समीक्षक डॉ. सुनंदा जुलमे यांनी केले. त्यांनी समीक्षेच्या दृष्टिकोनातून वैचारिकतेचा एक-एक पदर उलगडून दाखविला. कवी इ.मो. नारनवरे यांनी मनुष्यप्रवृत्तीच्या संघर्षातून निर्माण झालेली ही दीर्घ कादंबरी आहे, असे विचार व्यक्त केले. डॉ. प्रदीप आगलावे यांनी समाजाला दिशा देणारी ही कादंबरी आहे, असे म्हटले. डॉ. प्रकाश खरात यांनी या कादंबरीचे विश्लेषण करून कादंबरी लिखाणाचा प्रकार हा सहजशक्य नाही, तो विद्या भोरजारे बांनी यशस्वीपणे साकार केला, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. डॉ. धनराज डाहाट यांनी या कादंबरीमागचा मानवतावादी दृष्टिकोन विश्लेषित केला.

कार्यक्रमाच्या सुरवातीला प्रमोदकुमार भोरजारे यांनी भीमगीत सादर केले. या कार्यक्रमाचे मंचसंचालन डॉ. मच्छिंद्र चोरमारे यांनी केले. या कार्यक्रमाला समाजातील विविध स्तरातील लोक सहभागी झाले होते. त्यामध्ये चंद्रकांत वानखेडे, का.रा. बालदेकर, डॉ. विनोद जीवनतारे, मनोहर गजभिये, नरेंद्र शेलार, श्वेता टेंभूर्णे माटे इत्यादी मान्यवर मंडळी सहभागी झाली होती. या प्रसंगी संकेत प्रकाशनाचे प्रकाशक राजप्रिय डाहाट यांचा सत्कार करण्यात आला. आभार प्रदर्शन शैला तागडे यांनी केल्यानंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# पार्किंगवर नको तर पारंपारिक जागेवर रहाट पाळण्याना परवानगी द्या!

तभा वृत्तसेवा पैठण दि ११:- येत्या २० ते २२ मार्च रोजी पैठणची यात्रा संपन्न होणार असून या सोहळ्यासाठी राज्यभरातून हौसे, गवशे व नवशे यांचा मोठा राबता असतो व या ठिकाणी मोठ्या प्रमाणात राहटपाळणे व विविध खेळाचे स्टॉलही लागतात यंदा राहटपाळण्यासाठी नप प्रशासनाने वाहनतळाची जागा निश्चित केल्याची सुत्राची माहीती आहे, मात्र हि जागा अत्यंत अपुरी असुन या ठिकाणी राहटपाळणे लावल्यास आपघाताची शक्यता नाकारता येत नाही म्हणुन यंदा देखील राहटपाळण्यासाठी जुने पंपहाऊस येथील परंपरागत जागा देण्यात यावी अशी मागणी भक्त भाविक व वारकर्यातून होत आहे.

पैठणच्या यात्रेचे मुख्य आकर्षण म्हणजेच राहटपाळणे या ठिकानी यात्रा काळात मोठी गर्दी दिसुन येते, आणि यामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे, एकदा नप प्रशासनाने राहटपाळण्यासाठी वाहनतळाची जागा दिली होती त्यावेळी या ठिकाणी मोठी गर्दी होत असल्याने पोलिस प्रशासनाची मोठी तारंबळ उडाली होती, व गुंड मवाली व रोडरोमीयो व पाकीटमारांची चांदी झाली होती, तेव्हा पासुन या ठिकाणी राहटपाळण्याला परवाणगी देऊ नये अशी मागणी होत आहे.

असे असतांना यंदाच्या साली देखील यात्रेतील राहटपाळण्यासाठी नप प्रशासनाने वाहनतळाची जागा निश्चित केल्याची माहीती हाती आली आहे, मात्र नप प्रशासनाच्या या निर्णयाला नागरीकांचा मोठा विरोध होत या बाबत खुद्द राहटपाळणेधारकांचे म्हणणे आहे, राहटपाळण्यासाठी जुन्या पंपहाऊसच्या शेजारची जागा हि प्रशस्त असुन या ठिकाणी येणार्या जाणार्यांची अडचण होत नाही व स्टॉल पण मोठ्या प्रमाणात लागत असल्याने नप प्रशासनाला देखील मोठा महसुल मिळतो, म्हणुन राहटपाळणे हे नेहमीच्या पारंपारीक पंपहाऊसच्या शेजारीच लावण्यात यावे अशी मागणी भक्त भाविक वारकयी व नागरीक करीत आहे.


## जाहीर प्रगटन

**मा. विदयामान दिवाणी न्यायाधिश (क स्तर) न्यायालय गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

दि.कि. अर्ज नं. १७४/२०२५.

अर्जदार : १) परिगाबाई काशिनाथ काळुंके वय ७५ वर्षे, धंदा- शेती, २) अशोक काशिनाथ काळुंके, वय ५२ वर्षे, धंदा शेती, ३) संजय काशिनाथ काळुंके, वय ४९ वर्षे, धंदा शेती, ४) दादासाहेब काशिनाथ काळुंके, वय ४८ वर्षे, धंदा - शेती, सर्व रा. राजणगांव नरहरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टनुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मा. न्यायालयात कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टनुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज श्री.ए. एस. करडे गंगापुर विधीज्ञ यांच्यामार्फत अर्ज सादर केला असुन, अर्जदार हे वरील ठिकाणाचे कायमचे रहीवाशी असुन असुन अर्जदार नं. १ यांचे सासरे व अर्जदार नं. २ ते ४ यांचे आजोबा नामे रामचंद्र त्रिंबक काळुंके हे दिनांक १५/०६/१९८१ रोजी व अर्जदार नं. १ यांची सासु व अर्जदार नं. २ ते ४ यांचे आजोबा अर्जदार यांची आजी नामे पार्वता रामचंद्र काळुके हया यापुर्वी व अर्जदार नं. १ यांची पती व अर्जदार नं. २ ते ४ यांचे वडील नामे काशिनाथ रामचंद्र काळुंके हे दिनांक १०/०१/२००९ रोजी मौजे राजणगांव नरहरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झाले आहे. मयत रामचंद्र त्रिंबक काळुंके व काशिनाथ रामचंद्र काळुंके यांना अर्जदार हे कायदेशिर वारसदार आहे अर्जदार यांना मयत रामचंद्र त्रिंबक काळुंके व काशिनाथ रामचंद्र काळुंके यांच्या वारसप्रमाणपत्र हे कार्यालयीन व शासकीय कामासाठी आवश्कता आहे. सदरील वारसप्रमाणपत्र देण्यास अर्जदारांच्या नावाने देण्यात यावे.

त्याअर्थी याबाबत आपला काही आक्षेप अथवा उजर असल्यास तीस दिवसाच्या आत स्वःता अथवा त्यांच्या विधीज्ञामार्फत या न्यायालयात सादर करावा नसता मुद्दतीनंतर वरील अर्जदाराच्या अर्जावर आपला कोणताही आक्षेप नाही असे गृहीत धरून पुढील कार्यवाही केली जाईल. करिता आज दिनांक ०७/०३/२०२५ रोजी सही व शिक्कानिशी देत आहे

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक | साहय्यक अधिक्षक

मा. दिवाणी क स्तर न्यायालय गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर



**शेतजमिनीबाबत कुठल्याही प्रकारचा खरेदीचा व्यवहार न करणे बाबत**

## जाहीर प्रगटन

माझे पक्षकार श्री. नारायण बंडू चव्हाण व श्री. किसन बंडू चव्हाण, धंदा शेती, रा. देव्हारी, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांची मौजे देव्हारी, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथील शेतजमीन गट नंबर ७८ मध्ये वडिलोपार्जित शेतजमीन आहे. सदरील शेतजमिनीची नोंद सुपडू बंडू चव्हाण यांचे नावे एकत्र कुटुंब कर्ता म्हणून नोंद आहे. परंतु, सुपडू बंडू चव्हाण हे त्यांचे नावावर शेतजमीन असल्याचा गैरफायदा घेऊन सदरील शेतजमीन सुपडू बंडू चव्हाण हे बेकायदेशीरपणे त्रयस्त इसमांना विक्री करण्याचे तयारीत आहे. सदरील शेतजमिनीमध्ये माझे पक्षकार यांचा देखील हितसंबंध असून कायदेशीर अधिकार आहे. माझे पक्षकार यांचा हितसंबंध व अधिकार नष्ट करण्याचे उद्देशाने सुपडू बंडू चव्हाण हे बेकायदा हस्तांतरण करण्याचे तयारीत आहे.

तरी सदर जाहीर प्रगटनाद्वारे समस्त जनतेस कळविण्यात येते की, मौजे देव्हारी, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथील गट क्रं. ७८ मधील ०१ हेक्टर ०० आर शेतजमिनीबाबत कुठल्याही प्रकारचा खरेदी-विक्री, सौदा, किंवा कुठल्याही प्रकारचा हस्तांतरणाचा व्यवहार करू नये, अन्यथा सदरचा व्यवहार हा कायद्याने रद्द समजण्यात येईल.

करिता सदरचे जाहीर प्रगटन दिले असे.

दिनांक:- १०/०३/२०२५.

सही/- | सही/-
मार्फत | जाहीर प्रगटन देणार.
ॲड स्वप्नील र. सुरळकर,
सोयगाव, जि (छ. संभाजीनगर)



# धर्माबाद नगर परिषद, धर्माबाद जि.नांदेड

दुरध्वनी व फॅक्स क्रं.०२४६५-२४४१२९ | E-Mail: codharamabad@gmail.com

जा.क्र.धनप/वार्षिक निविदा २०२५-२६/२०२५/१४ | दि. ११ /०३/२०२५


## जाहीर निविदा/दरपत्रक सूचना

धर्माबाद नगरपरिषद जि. नांदेड यांच्याकडून सालसन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षासाठी खालील तपशिलात नमूद केलेल्या कामाचे नोंदणीकृत इच्छुक गुत्तेदाराकडून निविदा/दरपत्रक मागविण्यात येत आहे. त्यानुसार इच्छुक निविदा धारकांनी त्यांच्या निविदा दिनांक १२/०३/२०२५ ते दिनांक २१/०३/२०२५ दरम्यान कार्यालयीन वेळेत नगर परिषद कार्यालयात सादर कराव्यात. सदर कामाच्या संपूर्ण अटी व शर्तो नगर परिषद कार्यालयात संबंधित विभागात पाहावयास मिळतील.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | निविदा फॉर्म किंमत रु. | निविदा अनामत रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १. | अधिकृत सनदी लेखापालाची वार्षिक तत्वावर नेमणूक करणे | १००० | ५००० |
| २. | पा.पु. विभागासाठी १ HP ते १० HP पंप व मोटर दुरुस्ती करणे | १००० | ५००० |
| ३ | पा.पु. विभागासाठी ब्लिचिंग पावडर पुरवठा करणे | १००० | ५००० |
| ४. | पा.पु. विभागासाठी तुरटी (ॲलम) A ग्रेड पुरवठा करणे | १००० | ५००० |
| ५. | कार्यालयीन साहित्याची छपाई करून पुरवठा करणे | १००० | ५००० |
| ६. | बॅनर, होर्डिंग्ज व त्यासाठी लागणारे फ्रेम तयार करून पुरवठा करणे | १००० | ५००० |
| ७. | संगणक साहित्य पुरवठा व दुरुस्ती करणे | १००० | ५००० |
| ८. | राष्ट्रीय उत्सव व समारंभ साजरा करण्यासाठी फोटोग्राफर व व्हिडीओग्राफर लावणे | १००० | ५००० |
| ९. | राष्ट्रीय उत्सव व समारंभ साजरा करण्यासाठी मंडप, लायटिंग, डेकोरेशन व इतर साहित्य पुरवठा करणे | १००० | ५००० |
| १०. | कार्यालयीन कामकाजासाठी झेरॉक्स काढणे | १००० | ५००० |
| ११. | शहरात विविध ठिकाणी धापे, नाल्या, रस्ते व तार फेन्सिंग करणे | १००० | ५००० |
| १२. | शहरात विविध ठिकाणी मुरुम, चुरी पुरवठा करून टाकणे | १००० | ५००० |
| १३. | स्वच्छता व अग्निशमन विभागातील विविध प्रकारची वाहने देखभाल व दुरुस्ती करणे | १००० | ५००० |

स्वाक्षरीत/-
मुख्याधिकारी
नगर परिषद धर्माबाद


## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (६३) समरसता

डॉक्टर हेडगेवार हे धगधगत्या ज्वालामुखी सारखे जन्मजात देशभक्त होते संघाला मुस्लिम विरोधी - इसाई विरोधी- अंग्रेज विरोधी म्हणत असत. परंतु डॉक्टर म्हणायचे समाजात एकता व समन्वय सुदृढ करायचा असेल तर आपण हिंदूंनीच आधी सुधारणे आवश्यक आहे. आपल्या पतनासाठी अधोगतीसाठी दुसऱ्यावरय दोषारोप करू नका. उगाच विरोधक बनू नका. व संघटनेमुळे मिळणारी आपली ताकद दाखवा यामुळे हिंदू विरोधी सूर थंड होतील हिंदूंना असंघटित व आत्मविस्मृत स्थितीत राहू नका. समता आणि बंधुभाव ठेवण्याची जबाबदारी दोन्ही पक्षांची असते; याची त्यांना जाणीव करून द्या. सामाजिक समरसता ही भावना सुदृढ करा. समरसता हा डॉक्टरांनी सांगितलेला मार्ग म्हणून ओळखल्या जातो. ते म्हणतात आपले कार्य समग्र हिंदू समाजाचे आहे. त्याच्या कोणत्याही अंगाची उपेक्षा करू नका. हिंदू बांधवांना उच्च-नीच श्रेणी देऊ नका. स्पृश्य अस्पृश्य भेदाभेद विसरून प्रत्येकाशी आमचा व्यवहार प्रेमाचाच असला पाहिजे, अशी सक्त ताकीद ते देतात. ते बंधूभावाचा आग्रह धरतात. (आज सामाजिक समरसतेचा एक आयाम म्हणून झुंड चित्रपट अवश्य पहावा) शाखेत रोज समरसता श्लोक म्हणतात तो असा

हिन्दवः सोदराः सर्वे,
न हिन्दू पतितो भवेत्।
मम दीक्षा हिन्दूः रक्षा,
मम मंत्रः समानता ।।
जय श्री राम

अर्थात् सर्व हिंदू सहोदर म्हणजे भाई-भाई आहेत. कोणताही हिन्दू पतीत होऊ शकत नाही. माझी दीक्षा ही हिन्दू रक्षा आहे, आणि हा माझा समानता मंत्र आहे. अर्थात हा मंत्र समरसता शिकवतो. क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती


By Hand Adv. Kurtadikar O.J.

## जाहीर प्रगटन

**नांदेड येथील तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ यांच्या न्यायालयात**

आर.सी.ए. क्र. १०८/२०२३

लोकडोजी संभाजी गोणेवाड विरूध्द इंदुबाई भ्र.मारोती सोळंके व इतर

प्रति,

Respondent-3 : Mangal Meenakshi w/o Marotirao Gunjkar Age: 40 years, Occu. Household R/o. Mulawa Tq. Umarkhed Dist. Yavatmal.

ज्याअर्थी अर्जदार लोकडोजी संभाजी गोणेवाड वय ७६ वर्ष, धंदा शेती, रा. माळकौठा ता.मुदखेड जि. नांदेड यांनी आपल्या विरुध्द मनाई हुकुम मिळण्यासाठी उपनिर्दिष्ठ गैरअर्जदारा विरुध्द या न्यायालयात नियमित दिवाणी अपिल. क्र. १०८/२०२३ हे प्रकरण दाखल केले आहे.

त्याअर्थी उपरोक्त खटल्यात आपल्या उपस्थितीसाठी समन्स काढण्यात आले परंतु ते न-बजावता परत आले. आपण समन्स घेण्यास जाणुनबुजुन टाळाटाळ करीत आहात असे अर्जदार यांचे म्हणणे आहे.

सबब हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे. करीता दिनांक २५/०४/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता आपण जातीने किंवा वकीलामार्फत या न्यायालयात हजर रहावे.

याद्वारे आपणास नोटीस देण्यात येते की, आपण दिनांक २५/०४/२०२५ रोजी या न्यायालयात उपस्थित राहण्यास कसुर केल्यास सदरील मनाई हुकुम मिळण्यासाठीचे प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल.

आज दिनांक ११/०३/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक | सहायक अधिक्षक

जिल्हा न्यायालय, नांदेड



## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर.**

दि.कि.अर्ज क.१७५/२०२५

अर्जदार :- १. हुसेनाबी भ्र. मोहम्मद पठाण, वय ७५ वर्षे, धंदा घरकाम, २. समद पि. मोहम्मद पठाण, वय ४७ वर्ष, धंदा शेती, ३. अकबर पि. मोहम्मद पठाण वय ४२ वर्ष, धंदा मजुरी, सर्व रा. जामा मस्जीद जवळ, गंगापुर, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर, ४. मुमताज भ्र. रशिद शेख, वय ३८ वर्ष, रा. जिल्हा परिषद कन्या शाळेजवळ, काजीपुरा, गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणे कामी त्यांचे विधिज्ञ ॲड.बी.आर.राजपुत यांचे मार्फत अर्ज दिला की, अर्जदार क. १ ही अर्जदार क. २ ते ४ यांची आई असुन अर्जदार क. २ ते ४ हे आपसात सख्खे भाउ बहीन आहे. अर्जदार क. १ चे पती व ईतर अर्जदार यांचे पडील नामे मोहम्मद ईमाम पठाण हे दिनांक २४/०९/२०१२ रोजी मौजे भालगाव ता. गंगापुर येथे मयत झाले असुन असुन अर्जदार हे मयत मोहम्मद ईमाम पठाण यांचे एकमेव वारस आहेत. अर्जदारां व्यतीरिक्त मयतास ईतर कुणीही वारस नाहीत. मयत मोहम्मद पठाण यांचे आई वडील हे दोघेही ब-याच वर्षापुर्वी मयत झालेले आहेत. अर्जदारांना शासकीय कामाकरीता ते मयत मोहम्मद ईमाम पठाण यांचे एकमेव वारस असल्याबाबत हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्या अर्थी तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जास कोणाचाही काहीही आक्षेप उजर असल्यास संबंधीतांनी त्यांचा आक्षेप या न्यायालयात व्यक्तीश अथवा विधीज्ञांमार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांना नियमाप्रमाणे त्यांचे मागणीनुसार हेअरशिप प्रमाणपत्र जारी करण्यात येईल करीता हे जाहीर प्रगटन माझ्या सही व शिक्याने आज दिनांक १०/०३/२०२५ रोजी दिले.

आदेशानुसार
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय गंगापुर, ता. गंगापुर



## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ११२/२०२५.

अर्जदार : १. नंदकिशोर मधुकर पगारे, वय. ५४ वर्षे, धंदा. नौकरी, रा. प्लॉट नं. १८५, रुम नं. २, प्रथमेश अपार्टमेंट, कांसाई विभाग, ऐ.एम.पी. गेट जवळ, अंबरनाथ, जि. ठाणे. २. गणेश मधुकर पगारे, वय. ४७ वर्षे, धंदा. नौकरी, रा. ०१, काजल अपार्टमेंट, ऐ.एम.पी. गेट जवळ, कांसाई विभाग, अंबरनाथ पुर्व, जि. ठाणे. ३. रेखा राजेंद्र शिंदे, वय. ५६ वर्षे, धंदा. घरकाम, रा. प्लॉट नं. २२८, धनलक्ष्मी अपार्टमेंट, अंबरनाथ जि. ठाणे. ४. मनिषा मधुकर महाले, वय. ५२ वर्षे, धंदा. घरकाम, रा. प्लॉट नं. ०१, भडगांव रोड, जिजामाता कॉलनी, पाचोरा, जि. जळगांव.

-विरुध्द-

गैरअर्जदार : कोणीही नाही.

प्रकरण : वारस प्रमाण-पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांने वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी ॲड. वाय. आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत शांताबाई मधुकर पगारे हे दि. ०७/०१/२०२३ रोजी त्यांचा मृत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ व ४ हे मयत शांताबाई मधुकर पगारे यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाटी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह अजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल. पुढील तारीख :- १६/०४/२०२५.

आज दि. १०/०३/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.

आदेशांवरुन

विभागीय लिपीक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांय.

## अग्रलेख...

# विकास आता लांबणार नाही

प्रचंड बहुमत देऊन राज्यातील जनतेने सोपविलेल्या सत्तेचे सोने करायचे असेल तर काय करावे याचे नेमके भान असलेला राज्याचा सन २०२५-२६ या आगामी आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प सोमवारी वित्तमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत मांडला, तेव्हा अपेक्षेप्रमाणे विरोधकांनी विरस झाल्याचा सूर लावलाच होता. पण जनतेच्या अपेक्षांची पूर्तता आणि राज्याचे सर्वांगीण हित या बाबींना सर्वोच्च प्राधान्य असले, म्हणजे किमान समान कार्यक्रमाबाबत सत्तेच्या सर्व सहभागी पक्षांमध्ये कसे अतूट ऐक्य असते, हे दाखवून देताना राज्यातील कोणत्याही योजनांना कोणतीही कात्री न लावता आणि गरीब, महिला, मध्यमवर्गीय, शेतकरी आणि कष्टकऱ्यांच्या खिशात हातदेखील न घालता नव्या भविष्याचे एक सुंदर चित्र उभे करण्याचे कौशल्य देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने दाखविले आणि हेच चित्र मोठ्या विश्वासाने विधानसभेत मांडून अजित पवार यांनी ऐक्याच्या भावनेचे आगळे दर्शनही घडविले. राज्याचे आणि जनतेचे हित हे समान उद्दिष्ट समोर ठेवूनच जेव्हा काही राजकीय पक्ष एकत्र येतात, तेव्हा त्या पक्षांच्या स्वतःच्या राजकीय धारणा आणि विचारसरणींचा कोणताही अडसर या उद्दिष्टाच्या आड येत नाहीत, हे दाखवून देणारा आणि जनतेच्या अपेक्षांचे भान असल्याची ग्वाही देणारा अर्थपूर्ण अर्थसंकल्प असे महाराष्ट्राच्या नव्या वर्षाकरिता सादर झालेल्या अर्थसंकल्पाचे वर्णन करता येईल. विशेष म्हणजे, अर्थसंकल्पाच्या पूर्वसंध्येस विरोधकांनी सरकारला तंबी देण्याच्या आविर्भावात काही सूचना केल्या होत्या. त्यामध्ये राज्याच्या हिताचे भान असेलही, पण त्याचा सूर मात्र, सरकारला कोंडीत पकडण्याचाच होता, हे नंतरच्या विरोधकांच्या पवित्र्यावरून पुरेसे स्पष्ट झाले. महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीआधी महायुतीने दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्याच्या मुद्द्यावरून सरकारवर कुरघोडी करण्याकरिता विरोधकांनी आपली वैधानिक हत्यारे अगोदरपासूनच परजून ठेवली होती, हे अधिवेशनाच्या अगदी पहिल्या दिवसापासूनच स्पष्ट दिसू लागले होते. ज्यांनी निवडणुकीआधी महायुतीच्या लाडकी बहीण योजनेची खिल्ली उडविली होती, या योजनेमुळे सरकारी तिजोरीचा बोजा असह्य होणार असल्याने राज्य आर्थिक संकटात सापडेल असे भाकीत वर्तवत या योजनेबाबत लाभार्थी व सामान्य जनतेच्या मनातही संभ्रम माजविण्याचा प्रयत्न? चालविला होता, त्याच योजनेतील लाभार्थींच्या मासिक लाभात वाढ करण्याकरिता सरकारवर दबाव आणण्याचा विरोधकांचा पवित्रा होता. गेल्या आठवड्यात या मुद्द्यावरून विरोधकांनी राज्याच्या मंत्री अदिती तटकरे यांना कोंडीत पकडण्याचा प्रयत्नदेखील केला होता. सोमवारी अर्थसंकल्प सादर करताना महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींचे कान हीच घोषणा ऐकण्यासाठी विधिमंडळाकडे लागून राहावेत, यासाठीची ही नियोजनबद्ध आखणीच होती. त्यामुळे, या योजनेच्या लाभाची रक्कम वाढवून एकविसशे रुपये एवढी करण्याबाबत राज्य सरकार कोणती भूमिका घेणार याबाबतची उत्सुकता निर्माण होणे साहजिकही होते. अजित पवार यांनी मोठ्या खुबीने हा मुद्दा हाताळल्याने विरोधकांचा विरस झाला आहे. राज्यात सध्या राबविण्यात येत असलेल्या योजनांचे मूल्यमापन करून त्यांचे सुसूत्रीकरण करणे आणि साधनसंपत्तीच्या स्रोतांचा अभ्यास करून त्यामध्ये वाढ करण्याच्या उपाययोजना सुचविणे यासाठी नेमण्यात आलेल्या उच्चस्तरीय समितीच्या शिफारशी विचारात घेऊन योजनांची अधिक प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्यात येणार असल्याची त्यांची ग्वाही या योजनांच्या विद्यमान लाभार्थींना सुखावणारी ठरणार आहेच, पण महत्त्वाकांक्षी योजनांना निधीचा शाश्वत पुरवठा व्हावा यासाठी केंद्र सरकारकडून तसेच आंतरराष्ट्रीय वित्तीय स्रोतांकडून साह्य मिळविणे, सार्वजनिक मालमत्तेचे मुद्रीकरण, अशा काही नव्या अभिनव उपाययोजनाही सरकारने आखल्याने, योजनेच्या स्थैर्याबाबत संभ्रम माजविण्याचे विरोधकांचे मनसुबे फसल्यागत झाले आहेत.

केवळ लाडकी बहीण योजना हाच महाराष्ट्राच्या उज्ज्वल भविष्याच्या वाटचालीचा एकमेव मार्ग नाही, तर शेती आणि शेतकरी हा आर्थिक विकासाच्या वाटचालीचा मोठा भागीदार आहे, हे गतसालीच्या एकूण आर्थिक पाहणीवरूनच स्पष्ट झाले आहे. गेल्या दोन वर्षांत राज्याच्या कृषी क्षेत्राच्या कामगिरीत लक्षणीय वाढ झाली आहे. या तुलनेत उद्योग, सेवाक्षेत्रांच्या विकासदराने अपेक्षित पल्ला गाठला नाही हेही स्पष्ट झाल्यामुळे, यंदाच्या अर्थसंकल्पात या क्षेत्रांना उभारी देण्यासाठी काही ठोस उपाययोजना होणे अपेक्षितच होते. शेती, शेतीपूरक क्षेत्रे, शिक्षण, आरोग्य, पर्यटन, पायाभूत सुविधा, सामाजिक विकास अशा सर्वांगीण विकासाच्या वाटचालीस पोषक अशी भरीव तरतूद करून राज्याच्या आर्थिक उन्नतीचा दूरगामी आराखडा फडणवीस सरकारच्या नजरेसमोर तयार आहे, हेही या निमित्ताने स्पष्ट झाले. सन २०४७ मध्ये, स्वातंत्र्याच्या शतक महोत्सवी वर्षात आर्थिक उन्नतीच्या शिखरावर पोहोचून प्रगत राष्ट्रांच्या मालिकेत भारताचा तिरंगा अभिमानाने फडकत असेल, तेव्हा या कर्तबगारीवर महाराष्ट्राच्या या महत्त्वाकांक्षी वाटचालीची मोहर उमटलेली असेल, याची जाणीव आपल्या भाषणातून अर्थमंत्री पवार यांनी उघड केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पपूर्तीला आणि पर्यायाने महाराष्ट्राच्या विकासाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'महाराष्ट्र आता थांबणार नाही' या विश्वासाला बळ देणारा अर्थसंकल्प सादर करून अजित पवार यांनी राज्याच्या विकासाचे एक आश्वासक चित्र रंगविले आहे.

कालपरवापर्यंत, अर्थसंकल्प समजून घेणे सर्वसामान्यांस सोपे वाटत नसे. माध्यमांनी रंगविलेल्या त्या चित्रातून, केवळ रुपया कसा येणार आणि कसा जाणार एवढ्या आलेखातून अर्थसंकल्पाचा अर्थ शोधण्याच्या क्षमता मर्यादित राहिल्या होत्या. काही वेळा राजकीय नेत्यांनाही हाच संभ्रम पडत होता. राजकीय प्रतिक्रियांच्या भाषेत बोलावयाचे झाले, तर विरोधकांनी अर्थसंकल्पवर टीका करावी आणि सत्ताधाऱ्यांनी स्तुतिसुमने उधळावीत एवढाच उपचार अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर राजकारणाच्या तंबूत पार पाडला जात असे. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी तर, अर्थसंकल्पाची उकल करण्यातील आपल्या मर्यादांची स्पष्ट कबुलीदेखील दिली होती. बहुधा त्यामुळेच, अर्थसंकल्प कसा समजून घ्यावा याबाबतचे अभ्यासपूर्ण विवेचन असणारे पुस्तकच देवेंद्र फडणवीस यांनी लिहिले असावे आणि उद्धव ठाकरेच नव्हे, तर विरोधकांतील आणि सत्ताधाऱ्यांतील अनेकांना या पुस्तकामुळे अर्थसंकल्पाच्या आवाक्याचे आणि मर्यादांचेही नेमके भान आले असावे. आगामी वर्षांत महसुली जमा आणि महसुली खर्चातील तफावतीमुळे ४५ हजार ८९२ कोटींची महसुली तूट येईल, असा अंदाज आहे. मात्र, ही तूट कायद्याच्या चौकटीस मान्य असल्यामुळे, राज्याचा आर्थिक डोलारा डळमळीत होणार नाही याची काळजी घेण्याचे भानही सरकारने दाखविले आहे. मोटार वाहन कराच्या नव्या आकारणीतून राज्याच्या तिजोरीत सुमारे ११०० कोटींची भर पडण्याचा अंदाज आहे. गेल्या वर्षभरात राज्यात विजेवर चालणाऱ्या वाहनांच्या संख्येत जवळपास अडीच लाख वाहनांची भर पडली आहे. एका बाजूला हे चित्र असताना, राज्यातील उद्योगधंदे, विकास प्रकल्प आणि वाढत्या गुंतवणुकीमुळे निर्माण होणाऱ्या संधींमुळे रोजगारात वाढ होऊनही जवळपास ७० लाख रोजगारक्षम व्यक्ती बेरोजगार असल्याचे गेल्या वर्षीच्या पाहणीतून उघड झाले होते. या दोन्ही वास्तवांची सांगड घालताना अभावग्रस्ततेच्या शक्यता संपविण्याचा सरकारचा निर्धारही स्पष्ट झाला आहे. येत्या पाच वर्षांत राज्यात ४० लाख कोटींची गुंतवणूक आणि ५० लाख रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट ठेवून विकास आता लांबणार नाही, ही नवी ग्वाही राज्याला दिली आहे. फडणवीस सरकारच्या या संकल्पास जनतेच्या विश्वासाचे पाठबळ लाभले आहे. म्हणूनच, राज्याच्या हितासाठी विरोधकांनीही विकासाच्या या वाटचालीत सहभागी व्हायला हवे. अर्थसंकल्पाने त्यांना हीच संधी देऊ केली आहे.

## आंतरराष्ट्रीय

**वसंत गणेश काणे**

# ट्रम्प यांचे स्वप्न बृहन् अमेरिकेचे

**लेखांक ३ रा**

‘मेक अमेरिका ग्रेट अगेन’ (मागा) प्रमाणे ‘मेक इंडिया ग्रेट अगेन’ (मीगा) हा भारताचा ध्यास आहे, ही ट्रम्प आणि मोदी यांच्या चर्चेतली उभयपक्षी रोखठोक भूमिका बरेच काही सांगून जाते. यांच्या सहकार्यातून ‘मेगा’ म्हणजे काहीतरी विशाल/भव्य-दिव्य घडून येईल. मागा+मीगा=मेगा. अमेरिका व भारत यांची मिळून एक विशाल भागीदारी असावी, अशी टिप्पणी मोदींनी चर्चेचा समारोप करताना केली होती.

गेली अनेक वर्षे शिक्षणासाठी किंवा/आणि नोकरीसाठी अमेरिका हे जगातल्या विद्यार्थ्यांचे पसंतीचे ठिकाण राहिले आहे. अनेक भारतीय विद्यार्थ्यांचेही हेच स्वप्न असते. अमेरिकेतील शिक्षणाच्या संधी, तेथील शिक्षणाचा स्तर आणि नंतर आवडीच्या क्षेत्रात नोकरीची उपलब्धता यांचे विद्यार्थ्यांना विशेष आकर्षण असते. पण आज ट्रम्प यांनी स्वीकारलेल्या धोरणांमुळे अनेक विद्यार्थ्यांची आर्थिक अडचण होते आहे. तपासणी करणारे अधिकारी विद्यार्थ्यांना ते पैसे मिळण्यासाठी करीत असलेल्या कामाबद्दलची कागदपत्रे दाखवण्यास सांगतात. एफ-१ व्हिसाधारक आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना कॅम्पसमध्ये पैसे कमावण्यासाठी आठवड्यातून जास्तीत जास्त २० तास काम करण्याचीच कायदेशीर परवानगी आहे. या बंधनाला ‘वर्क टाईम कॅप’ असे म्हणतात. परंतु यातून मिळणारी रक्कम विद्यार्थ्यांचा रोजचा खर्च चालवण्यासाठी आणि शिक्षणासाठी घेतलेले कर्ज फेडण्यासाठी पुरेशी नसते. म्हणून हे विद्यार्थी उपाहारगृहे, पेट्रोल पंप आणि दुकानांमध्येही नोकरी करतात. अशी कमाई करणे ही विद्यार्थ्यांची गरज असली, तरी तो अमेरिकेत पैसे मिळविण्याचा अनधिकृत मार्ग ठरतो. तपासणीत हे उघडकीस आले तर हद्दपारी होऊ शकते, या भीतीने अमेरिकेतील परदेशी विद्यार्थी जगत हादरून गेले आहे. ही परिस्थिती दिवसेंदिवस अधिकाधिक तणावपूर्ण होत चालली आहे. अनधिकृत काम करणे सोडून द्यावे तर खर्चाचे काय?

ट्रम्प यांचा ‘अमेरिका फर्स्ट’ हा अजेंडा प्रभावीरीतीने राबविला जातो आहे. ‘नोकऱ्यांचे बाबतीत स्थानिकांना प्राधान्य’ या धोरणामुळे विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण केल्यानंतर नोकऱ्या मिळणे कठीण होणार आहे आणि ज्यांना यापूर्वी मिळाल्या आहेत त्यांच्या नोकऱ्या केव्हा जातील, याचाही नेम राहिलेला नाही. पूर्वी



अमेरिकन मालक व्हिसाचे प्रायोजकत्व स्वीकारीत. शिक्षण पूर्ण झाल्यावर नोकरी देऊ, अशी भूमिका घेत असत. त्यामुळे व्हिसा मिळणे काहीसे सोपे झाले होते. आता स्थानिकांना प्राधान्य देण्याच्या धोरणामुळे नोकऱ्या कमी होणार आहेत. याचा परिणाम व्हिसा मिळण्यास अडचणी निर्माण होण्यात होणार आहे.

टेस्लाचे सीईओ ॲलन मस्क आणि रिपब्लिकन पक्षाचे एक प्रभावी नेते विवेक रामास्वामी यांसारख्या ट्रम्पच्या सल्लागारांनी उच्च-कौशल्य धारण करणाऱ्यांना स्थलांतर करण्यास हरकत नसावी, अशी भूमिका घेतली होती. परंतु, ट्रम्प यांची एच-१बी बाबतची भूमिका धरसोडीची आहे. एच-१बी व्हिसाच्या आधारे पदवीधर असलेल्या कुशल परदेशी कामगारांना अमेरिकेमध्ये तात्पुरते काम करण्यास परवानगी मिळते. दर तीन वर्षांनी त्याचे नूतनीकरणही केले जाऊ शकते. पुढे कायमस्वरूपी निवासासाठी आणि ग्रीन कार्डसाठी हे पहिले पाऊल मानले जाते. ही सोय भविष्यात खूप कमी लोकांना उपलब्ध होणार आहे. म्हणून विद्यार्थी जगतात आता उच्च शिक्षणासाठी पर्याय म्हणून ब्रिटन, जर्मनी, आयर्लंड, इटली आणि फ्रान्स यांसारख्या युरोपीय देशांचा विचार करायला सुरुवात होते आहे, असे दिसते. पण स्थानिकांच्या रेट्यापुढे त्यांचीही धोरणे भविष्यात बदलणारच नाहीत, याचा काय भरवसा? देशातच उत्तम नोकरीच्या आणि शिक्षणाच्या संधी उपलब्ध असणे, हाच या सर्वांवरचा खात्रीलायक उपाय आहे. ‘बेकायदा स्थलांतरितांना मायदेशी पाठविण्याचा अमेरिकेच्या इतिहासातील सर्वांत मोठा कार्यक्रम’ डोनाल्ड ट्रम्प यांनी हाती घेतला आहे. गेल्या काही काळात युरोप-अमेरिकेसह अनेक देशांमध्ये बेकायदा स्थलांतरित नागरिकांचा प्रश्न उग्र रूप धारण करीत आहे. या स्थलांतरितांच्या विरोधात त्या त्या देशांतील नागरिकांच्या भावना तीव्र होत आहेत. साहजिकच हा मुद्दा निवडणुकीत लोकप्रिय ठरला आणि नागरिकांच्या असंतोषावर स्वार होणारे राजकारणी त्या त्या देशात सत्तेवर आले.

अमेरिकेतील सर्वाधिक बेकायदा स्थलांतरित हे लॅटिन अमेरिकी देशांमधील आहेत. त्यामध्ये मेक्सिको, ग्वाटेमाला आणि होंडुरास हे देश आघाडीवर आहेत. एका अहवालानुसार तेथे सव्वासात लाख भारतीयही अमेरिकेत अवैधरीत्या राहत असल्याचे सांगितले जाते. सध्या बेकायदेशीररीत्या राहणाऱ्या सुमारे १८ हजार भारतीयांची ओळख ट्रम्प प्रशासनाला पटली आहे. त्यापैकी शेकडो जणांना लष्करी विमानाने परत पाठविण्यात आले. त्यामधील काही जणांनी बेकायदेशीर रीतीने सीमा ओलांडून अमेरिकेत प्रवेश केला होता, तर काही जण नियमांचे उल्लंघन करून किंवा पुरेशा कागदपत्रांविना अमेरिकेत राहत होते, असे निदर्शनास आले आहे. व्हिसाची मुदत संपल्यावरही तेथेच वास्तव्य करणारे नागरिकही त्यात आहेत. ‘ग्रीन कार्ड’चे नूतनीकरण न केल्यानेही काही जण बेकायदा नागरिकांच्या यादीत आले आहेत. काही जणांनी अमेरिकी पती-पत्नीशी घटस्फोट घेतल्याने त्यांना नागरिकत्वाचे कायदेशीर संरक्षण राहिलेले नाही. अशा सर्वांना ट्रम्प प्रशासनाने ‘घुसखोर’ ठरविले असून सर्व संबंधित देशांच्या प्रमुखांशी चर्चा करून पाठवणीचा कार्यक्रम आखला आहे. पण सध्यातरी हा कार्यक्रम भारतीयांपुरताच मर्यादित दिसतो आहे. ‘मित्र’ देशाकडून यापेक्षा अधिक समजूतदारपणाची अपेक्षा असते.

भारतीयांच्या या परत पाठवणीच्या मोहिमेला सहकार्य करण्याची भूमिका घेण्याविना भारतापुढे सध्या तरी पर्याय दिसत नाही. भारत उपद्रवी स्थलांतरितांमुळे बेजार असला, तरी अमेरिकेत स्थलांतर करणारे भारतीय असे उपद्रवी नाहीत. ते त्या देशाच्या संपन्नतेत मोलाची भर घालत आहेत. इतर देशांतील बेकायदा स्थलांतरितांमधील उपद्रवी, अतिरेकी आणि दहशतवादी जगातील सर्वच देशांना त्रासदायक ठरत आहेत. ठिकठिकाणी धार्मिक व आर्थिक स्वरूपाचे प्रश्न निर्माण करीत आहेत. आसाममध्ये तर घुसखोरच शिरजोर झाले आहेत की काय, असे वाटू लागते. जागतिक अर्थकारण आणि नोकरी-व्यवसायांतील संधी यांचे बदलते चित्र पाहता सर्वच देशांना उपद्रवी स्थलांतरितांच्या प्रश्नाला आता सामोरे जावेच लागणार आहे. गरजूंना आश्रय देताना त्यांच्या सोबतीने बेमालूमपणे येणाऱ्या उपद्रवी, अतिरेकी, दहशतवादींमुळे नवे प्रश्न निर्माण होणार नाहीत, याची काळजी सगळ्यांनाच घ्यावी लागेल.

९४२२८०४४३०

## वेध

**नितीन शिरसाट**

# अमली पदार्थांच्या तस्करीने युवकांचे आरोग्य धोक्यात

होळी, रंगपंचमी हा पारंपरिक सण दरवर्षी मोठ्या संख्येत आबालवृद्धांपासून तरुण-तरुणी हर्षोल्हासात साजरा करतात. या दिवशी आदिवासी समाजातील महिला महाराष्ट्र, मध्यप्रदेश, राजस्थान यासह इतर प्रातांत पतीला लाठीमार करून वर्षभरात झालेल्या चुकांचा पत्नी हक्काने समाचार घेत असल्याची परंपरा आजही कायम आहे. या सणाला मद्य, गांजा, अफू, भांग अशा अमली पदार्थांची मोठ्या प्रमाणात विक्री केली जाते. पोलिसांच्या सतर्कतेमुळे शेती पिकात होणाऱ्या गांजा व अफूच्या शेतीवर धाड टाकून कारवाई केली जाते. गेल्या एक महिन्यापूर्वी बुलढाणा तालुक्यातील धाडनजीक स्थानिक गुन्हे शाखेने आंध्र प्रदेशातून येणारा ९२ लाख रुपयांचा गांजा पकडला होता. त्यानंतर हत्ता-तांबोळा परिसरात एका शेतकऱ्याने दुर्गम भागातील आपल्या तीन एकर शेतात तुरीच्या शेतात गांजाची शेती केल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली होती. पोलिस निरीक्षक अशोक लांडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी कारवाई करीत एक कोटी ४० लाख २७ हजार रुपयांचा गांजा जप्त केला आहे. अमली पदार्थ प्रतिबंधाविरोधातील ही अलिकडील काळात मोठी कारवाई आहे. आतापर्यंत जिल्हा पोलिस अधीक्षक विश्व पानसरे यांच्या पथकाने गेल्या चार महिन्यात १७ कोटी ८४ लाख १६ हजार रुपयांचा अफू व गांजा शेती करणाऱ्यांवर कारवाई केली आहे.

मध्य प्रदेश आणि महाराष्ट्र राज्याच्या सीमेवर सातपुडा पर्वताच्या रांगा व घनदाट जंगल आहे. याच भौगोलिक परिस्थितीचा फायदा घेत अवैध शस्त्रांसह अमली पदार्थांच्या तस्करीचा प्रकार दोन्ही राज्यांच्या सीमेवर सतत सुरू असतो. विशेषतः मध्य प्रदेशात या प्रकारांकडे फारसे लक्ष दिले जात नसल्याची झळ लगतच्या महाराष्ट्रातील जळगावसह धुळे जिल्ह्याला बसतो. जळगाव जिल्ह्यातील चोपडा तालुक्यात खासकरून सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या गावांमध्ये राजरोसपणे गांजाची शेती करण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढत चालले आहेत. धक्कादायक बाब म्हणजे शासनाकडून उपजीविकेसाठी मिळालेल्या वनपट्ट्यांवरही गांजाची शेती केली जात आहे. शेतकऱ्यांना शेतीपूरक व्यवसाय करता यावा या हेतूने अफू आणि गांजाची शेती करण्याची परवानगी मिळावी यासाठी पुणे जिल्ह्यातील काँग्रेसच्या एका नेत्याने पत्राद्वारे थेट जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी केल्याने खळबळ उडाली आहे. ग्रामपंचायतीच्या अवाजवी कर आकारणीमुळे हतबल झालेल्या काँग्रेसच्या नेत्याकडे ही मागणी केल्याने सगळेच अवाक्? झाले आहेत. काँग्रेसचे पुणे जिल्हा सरचिटणीस नंदकुमार चौधरी यांनी ही मागणी पत्राद्वारे केली आहे. त्यांनी २००७ पासून शासनाच्या चुकीच्या निर्णयामुळे बळी जात असलेल्या शेतकऱ्यांच्या यादीत त्यांचा समावेश आहे. कुक्कुटपालन आणि गाई-म्हशीपालन हा व्यवसाय शेतीपूरक मानला गेला आहे. ज्याप्रमाणे शेती निसर्गावर अवलंबून असते. तसेच शेतकऱ्याच्या कोणत्याही पिकाला शासन हमीभाव देत नाही. कुक्कुटपालन व्यवसायदेखील हा या लहरी निसर्गावर आणि करार करणाऱ्या कंपन्यावर अवलंबून आहे. शासनाने करार पद्धतीने कार्यरत असणाऱ्या कंपन्यावर नियंत्रण ठेवलेले दिसून येत नाही. म्हणून सर्रास कुक्कुटपालन शेतकऱ्यांची वर्षानुवर्षे पिळवणूक करत आलेले आहेत, अशी शेतकऱ्यांची शेतीपूरक व्यवसायातून होणाऱ्या पिळवणुकीची व्यथा त्यांनी पत्राद्वारे मांडली आहे. कोरोना काळापासून तसेच पक्ष्यांवरील आजाराने कुक्कुटपालन व्यवसाय अत्यंत अडचणीत सापडला असून, या व्यवसायाला शासन कोणत्याही प्रकारची मदत करीत नसल्यामुळे व्यवसाय करणे कठीण झाले आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवण्यासाठी शेडमध्ये अफू व गांजा हे पीक घेण्यासाठी परवानगी द्यावी, अमली पदार्थांशी संबंधित कायद्याचे एकत्रीकरण आणि सुधारणा करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने तरतूद करावी अशी मागणी त्यांनी रेटून धरली आहे. धुळे जिल्ह्यात मध्यप्रदेशच्या सीमेलगत शिरपूर तालुक्यातील आंबा शिवरात वनजमिनीवर गांजाच्या शेतीवर गुन्हे शाखेच्या पथकाने ८ मार्च रोजी छापा टाकला. या छाप्यात २ कोटी २० लाखांची गांजा झाडं ताब्यात घेण्यात आली. पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलिस अधीक्षक किशोर काळे, उपविभागीय सुनील गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीचे पोलिस निरीक्षक श्रीराम पवार आणि त्यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे. या प्रकरणी पुढील तपास मनोज कचरे करत आहेत शिरपूर येथील कैलास पावराने गांजाची आधुनिक पद्धतीने लागवड केली. गांजाच्या पिकासाठी संपूर्ण शेतात ठिबकची व्यवस्था होती. तसेच दोन पिकांच्या मधोमध गांजाची लागवड केली होती. जेणेकरून गांजाकडे लक्ष जाणार नाही. परंतु पोलिसांनी यामध्ये कारवाई करत गांजा नष्ट केला आहे. अमली पदार्थाच्या सवयीमुळे युवक व्यवसाधीनतेकडे वळू लागला आहे. त्यामध्ये मध्यम तसेच उच्च श्रेणीतील कुटुंबाला मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे अनेकांची कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत.

९८८१७१७८२८

## विश्लेषण

**- चन्द्रशेखर टिळक**

# अर्थसंकेत आणि अर्थसंकल्प

आपल्या महाराष्ट्र राज्यासाठीचा आर्थिक वर्ष २०२५ - २६ या सालासाठीचा अर्थसंकल्प आपल्या राज्याचे अर्थमंत्री माननीय श्री. अजितदादा पवार यांनी आपल्या राज्याच्या विधानसभेला सोमवार, १० मार्च २०२५ रोजी सादर केला. ते भाषण ऐकत असताना मनात आलेले काही विचार असे या लेखाचे स्वरूप आहे. अशा नोंदी करायला सुरुवात करण्याआधीच मला हे स्पष्ट करू देत की हे लेखन म्हणजे या अर्थसंकल्पवरची टीका किंवा टिप्पणी नाही. या अर्थसंकल्पाचे हे समर्थनही नाही आणि विरोधही नाही. तर एकंदरीतच अर्थसंकल्प या महत्त्वपूर्ण घटने बाबतच मनातली प्रतिमा आणि प्रतिबिंब यांच्या दरम्यानचे तरंग आहेत. हा परिच्छेद म्हणजे या लेखाचा Disclaimer Clause आहे असे म्हणले तरी निश्चितच चालेल.

का कोण जाणे... पण हे भाषण ऐकत असताना , नंतर त्याबाबतची काही मोजकी कागदपत्रे पाहात असताना मला राहून राहून कौटिल्य प्रणित अर्थशास्त्र , विदुरनीती, कणकनीती यातले काही संदर्भ आठवत होते. या तिन्ही ठिकाणी सरकारी अर्थकारण या विषयाबाबत काही अर्थ संकेत दिले आहेत. त्या अर्थ संकेतांची मला विशेषत्वाने आठवण येत आहे. या तिन्ही ठिकाणी अर्थमंत्री आणि अर्थसंकल्प हे दोन्ही शब्द नाहीत याची मला पूर्ण जाणीव आहे. पण एकंदरीतच सरकारी अर्थकारण आणि त्याबाबतचे सरकारी अर्थ - प्रशासन याबाबतचे उल्लेख त्यात नक्कीच आहेत. त्याबाबतचा तिथे असणारा एक उल्लेख म्हणजे सरकारी अर्थ प्रशासनाची धुरा सांभाळणारी व्यक्ती राजाच्या मर्जीतील असावी. त्या व्यक्तीवर राजाचा पूर्ण विश्वास असावा. आता लोकशाही राज्य - व्यवस्थेत काही राजा नसतो.

निदान नसावा. पण राजा हा शब्द ध्वन्यार्थाने न घेता तो जर



भावार्थाने घेतला ( आणि तो तसाच घेतला पाहिजे ) तर त्यावेळचा राजा म्हणजे आजच्या लोकशाही परिभाषेत देशाचा पंतप्रधान किंवा राज्याचा मुख्यमंत्री. अशा परिस्थितीत या निकषांचा विचार करायचा झाला तर आपल्या राज्याचे अर्थमंत्री माननीय श्री. अजितदादा पवार यांच्यावर आपले मुख्यमंत्री माननीय श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांचा पूर्ण विश्वास आहे. काहींच्या मते तर माननीय देवाभाऊ यांचा स्वतःच्या पक्षातील मंडळींवर विश्वास नाही इतका माननीय अजितदादा यांच्यावर विश्वास आहे. अशा विश्वासाचा संदर्भ पुढे नेत कौटिल्य अर्थशास्त्र असे सांगते की राजाचा अर्थ - प्रमुखावर पूर्ण विश्वास असला की राजा संबंधित अर्थप्रमुखाला पूर्ण वाव देतो. त्यातून अर्थ प्रशासनात सुसूत्रता येते. अनावश्यक राजकीय हस्तक्षेप टाळला जातो. त्यातून अर्थकारण सुविहीत होते. हे दोन संदर्भ एकत्र घेत कौटिल्य अर्थशास्त्र आणि विदुर नीती असे सांगते की या दोन गोष्टींचा फायदा आणखीन जोमदारपणे मिळायला हवे असतील तर अर्थप्रमुख अनुभवी असावेत. माननीय अजितदादा विधी मंडळाचे सभासद म्हणून निश्चितच ज्येष्ठ आणि अनुभवी सभासद आहेत. त्याशिवाय निदान ५ वेळा ते आपल्या राज्याचे उपमुख्यमंत्री राहीले आहेत. माननीय अजितदादा अर्थमंत्री म्हणूनही अनुभवी आहेत. १० मार्च २०२५ रोजी त्यांनी सादर केलेला अर्थसंकल्प हा आपल्या राज्यासाठी सादर केलेला ११ वा अर्थसंकल्प आहे. त्याबाबतीत माननीय श्री. सुशीलकुमार शिंदे, माननीय श्री. जयंत पाटील यांच्यासारखी अर्थमंत्री पदाची प्रदीर्घ कारकिर्द माननीय श्री. अजितदादा यांनाही लाभली आहे. हे तीन संदर्भ एकत्रपणे पुढे नेत कौटिल्य अर्थशास्त्र असे सांगते की अर्थप्रमुख एकंदरीतच प्रशासनातील स्वतःच्या स्थानाविषयी निश्चित असावेत. तसे ते असले पाहिजेत. तरच ते प्रभावीपणे काम करू शकतात.

आता आपल्या राज्याच्या गेल्या काही वर्षातील राजकारणाचा विचार केला तर माननीय श्री. अजितदादा पवार यांच्या इतका स्वतःच्या पदाविषयी स्थिर आणि निश्चित दुसरा कोणीही राजकारणी आपल्या महाराष्ट्राच्या राजकारणात आजच्या घडीला नसेल. आपल्या राज्याचा मुख्यमंत्री कोणीही असू दे, आपले उपमुख्यमंत्री, आपले अर्थमंत्री, आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री माननीय श्री. अजितदादा पवार असणार हे निश्चीत आहे. हे ४ अर्थसंकेत अशासाठी महत्त्वाचे आहेत की या संकेतांची परिपूर्ती होते किंवा झाली की अर्थ प्रमुख दीर्घकालीन नियोजन करण्यास मानसिक दृष्ट्या सजग आणि प्रशासकीय दृष्ट्या सक्षम असतो. आता या साऱ्याचे प्रभावी प्रतिबिंब आपल्या राज्याच्या यंदाच्या अर्थसंकल्पात पडले आहे की नाही हे ज्याचे त्याने ठरवलेले बरे ! कारण आपल्या देशात आणि राज्यात लोकशाही आहे.

## वाचक पत्रे

### ‘आप’चा थयथयाट

‘भाजपच्या नेत्यांनी महिलांच्या तोंडाला पाने पुसली : आतिशी’ ही बातमी वाचली. दिल्ली विधानसभेत सत्तावीस वर्षांनंतर भाजपने प्रचंड बहुमत मिळवून आम आदमी पक्षाकडून सत्ता हिसकावून घेतल्यापासून आम आदमी पक्षाच्या नेत्यांचे मानसिक स्वास्थ्य हरवले आहे. महिलांना दरमहा २१०० रुपये देण्याचे भाजपने आश्वासन दिले होते. त्यादृष्टीने पक्षाने तयारीही सुरू केली आहे. योजनेला मंत्रिमंडळाची मंजुरी, त्यासाठी बजेटमध्ये तरतूदही करण्यात आली आहे. गरजवंतांसाठी अटी, शर्ती ठरवण्यासाठी त्रिसदस्यीय समितीचे गठन करण्यात आले आहे. या योजनेचा गैरफायदा कोणीही घेऊ नये यासाठी काही कडक नियम करणे आवश्यक आहेच. त्या प्रक्रियेला काही कालावधी लागणारच. आम आदमी पक्षाच्या नेत्यांनी अगदी शब्दांत पकडून भाजपला खिंडीत पकडण्याचा प्रयत्न केला. आता मदत मिळाली तरी ती आम आदमी पक्षामुळेच मिळाली असा अपप्रचार करण्याचा प्रयत्न ते करत आहेत.

वास्तविक येत्या पाच वर्षांत भाजप सरकार दिल्लीचा चेहरामोहरा असा बदलून टाकेल की इथून पुढे आम आदमी पक्षाला सरकारच काय पण दोन अंकी आमदार मिळणेही दुरापास्त होणार आहे हे आम आदमी पक्षाला ठावूक आहे. त्यासाठी ते भाजप सरकारच्या कामांचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न करणार हे उघड आहे. पण आम आदमी पक्षाच्या नेत्यांची सर्व नाटके जनता उत्तम प्रकारे जाणून आहे आणि म्हणून त्यांच्या थयथयाटाचा काहीही उपयोग होणार नाही.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

### वाचाळवीरांना आवरा

मागील काही दिवसांपासून महाराष्ट्रात वाचाळवीरांचे मोठे पेव फुटले आहे. हे वाचाळवीर फक्त राजकारणातीलच आहेत असे नाही तर राजकारणाबाहेरचेही आहेत. रोज कोणीतरी उठतंय आणि काहीतरी वादग्रस्त विधानं करून चर्चेत राहतो. कोणी महापुरुषांची बदनामी होईल अशी विधाने करतोय, तर कोणी मराठी भाषेचा अपमान होईल अशी वक्तव्य करतोय. बरं बोलून झाल्यावर प्रकरण अंगाशी येत आहे असे दिसू लागताच माझ्या वक्तव्यांचा विपर्यास केला गेला किंवा मी असे बोलोलोच नाही अशी सारवासारव करतात. प्रकरण खूपच अंगलट आलं की मग दिलगिरी व्यक्त करून किंवा माफी मागून माघार घेतात. प्रश्न असा पडतो की जर माघार घ्यायचीच असेल तर वाचाळवीरांकडून वादग्रस्त विधाने का केली जातात. आपल्या वादग्रस्त विधानांनी समाजाच्या भावना दुखावल्या जातात हे माहीत असूनही जाणीवपूर्वक वादग्रस्त विधाने करून सामाजिक वातावरण दूषित करून अराजकता माजवणाऱ्या या वाचाळवीरांना आवरण्याची वेळ आली आहे. वादग्रस्त विधाने करून सामाजिक वातावरण दूषित करणाऱ्या या वाचाळवीरांना कायद्याचा बडगा दाखवावा लागेल. भारतीय राज्यघटनेने अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिलंय पण अभिव्यक्ती स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे. जर अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा वापर इतरांचा भावना दुखावण्यासाठी आणि महापुरुषांच्या बदनामीसाठी होत असेल तर त्याला लगाम घालावाच लागेल. वादग्रस्त विधाने करून सामाजिक वातावरण दूषित करणाऱ्या वाचाळवीरांना रोखण्यासाठी कायद्यात सुधारणा करावी लागेल.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

### लोकसभेच्या जागांचा तिढा कसा सोडविणार?

स्वातंत्र्यानंतर देशाची लोकसंख्या वेगाने वाढत आहे. १९४७ च्या वेळी केवळ ३५ कोटी लोकसंख्या असलेला भारत आज १४० कोटी पार कडून जगात प्रथम क्रमांकावर आहे. उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, छत्तीसगड, बिहार राजस्थान या राज्यांची लोकसंख्या देशाच्या सरासरी १७ टक्के वाढीपेक्षा अधिक आहे. त्यामानाने दक्षिणेकडील पाच राज्यांत लोकसंख्या वाढीचा वेग कमी आहे. लोकप्रतिनिधी कायद्यानुसार लोकसंख्येच्या प्रमाणात लोकप्रतिनिधींची संख्या निश्चित होत असते. निधीचे वाटप सुद्धा त्यानुसार होत असते.

सध्याची लोकसभेची संख्या ५४३ एवढी आहे. १९७१ च्या जनगणनेनुसार १९७८ व २००८ अशा दोन वेळा मतदारसंघाची पुनर्रचना करण्यात आली होती. आता २०२६ मध्ये होणाऱ्या जनगणनेनंतर लोकसंख्येच्या आधारे लोकसभेच्या जागांची पुनर्रचना करण्याचा सरकारचा मानस आहे. यात सर्वांत नुकसान दक्षिणेकडील राज्यांचे होणार आहे. आता तामिळनाडूच्या सरकारने लोकसंख्या व विकासाच्या बाबतीत चांगली प्रगती केली आहे. असे असून जर लोकसंख्येच्या प्रमाणात लोकसभेच्या जागांचे वाटप झाले तर तो एक महत्त्वाचा मुद्दा बनू शकतो. आज जगात जपान, चीन आदी देश लोकसंख्या वाढ होऊ दे अशी याचना वेगवेगळ्या मार्गाने करत आहेत. काही वर्षात भारतावर सुद्धा ही वेळ येणार आहे. यावर केंद्र सरकारने एखादी समिती नेमून सर्वमान्य तोडगा काढावयास हवा.

**शांताराम वाघ**/९६२३४५२५५३

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस tbedit2016@gmail.com

तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# हिंदू म्हणून सर्वांनी एकजूट व्हावे : बागेश्वर धाम



**तभा वृत्तसेवा**
**तामसा ,दि. ११ मार्च-**

हिंदू धर्म वाचण्यासाठी, सर्वांनी एकत्र येणे फार गरजेचं असून आपला धर्म विश्वगुरू बनला पाहिजे व भारत हे हिंदू राष्ट्र झालं पाहिजे त्यासाठी मी सर्वोतोपरी पर्यत्नशील असून तो आम्ही करणार असा विश्वास धीरेंद्र शास्त्री बागेश्वा धाम यांनी व्यक्त केला. हदगाव तालुक्यातील पिंपळगाव येथे श्री शिवमहा पुराण कथे दरम्यान रात्री उशिरा आले असता बोलत होते.

हिंदु धर्मातील लोकांनाच दोन लेकराची अट सरकार लावते आणि इतर धर्मातील लोकांना तीस तीस लेकरं असं का असा सवालही या वेळी उपस्थित केला. तर आपणही किमान चार मुलं जन्माला घालावी कारण दोन घरच्या साठी एक राष्ट्रीय स्वयंसेवक संघा साठी आणि एक हिंदुराष्ट्र निर्मिती साठी द्यावे असे आवाहन येथे बोलतांना केलं. छत्रपती संभाजी महाराज यांनी शरीराचे एक एक अवयव धर्मासाठी शरीराच्या वेगळे केले पण धर्म सोडला नाही दुरसा धर्म स्वीकाराला नाही.हिंदु धर्मराक्षणासाठी आपल्या प्राणाची आहुती दिली.एकत्रित परिवार पद्धतीने आता काळबाह्य होत चालली ती टिकली पाहिजे. एकत्र राहण्याचे अनेक फायदे आहेत असेही ते म्हणाले एक लाकूड कोणीही सहज तोडू शकते पण त्याच पाच दहा लाकडाची मोळी तोंडाने शक्य नसतं त्या मुळे सर्व जाती हिंदु म्हणून एकत्र या नाहीतर तुमचा काश्मिरी पंडित, बंगला देशातील हिंदु, व्हायला वेळ लागणार नाही असेही त्यांनी यावेळी ठणकावून सांगितलं.

तर तरुणांनी निर्व्यसनी राहून आपला देश धर्म यासाठी झगडावे भारत हिंदु राष्ट कसे होईल याकडे लक्ष द्यावे. एकजुटीने राहावे. लव जिहाद, धर्मांतर यांनी आता डोके वर काढलं असून ते अतिशय घातक असल्याचे सांगितलं.

यावेळी व्यासपीठावर मूलकपिटाधीश्वर परमपूज्य राजेंद्रदास महाराज, शिव महापुराण कथेचे आयोजक तथा श्री दत्त संस्थान मठ पिंपळगावचे संस्थापक पिठाधीश्वर, गोवत्स बालयोगी व्यंकट स्वामी महाराज यांच्यासह हजारो साधुसंत यांची उपस्थिती होती. तर रात्री बारानंतर कार्यक्रम सुरू झाल्यावरही पंचक्रोशीतील जिल्ह्याभरातून बागेश्वर धाम प्रेमी फक्त लाखोच्या संख्येने उपस्थित होते. बागेश्वर धामच्या या धर्म सभेसाठी ची उपस्थिती या कार्यक्रमातल्या आत्तापर्यंतच्या सर्वात मोठी उपस्थिती होती. यावेळी तगडा बंदोबस्त ही लावण्यात आला होता. सुरुवातीला पिठाधीश्वर बालयोगी गोवत स व्यंकट स्वामी महाराज यांच्याकडून त्यांचे यथोचित सन्मान करून परमपूज्य राजेंद्र दास महाराज यांनी धीरेन शास्त्री बागेश्वर धाम यांच्या धर्म कार्याचा उल्लेख उपस्थित भक्ता समोर मांडला.

# 'स्वारातीम' विद्यापीठामध्ये मेगा जॉब फेअरचे आयोजन : कुलगुरू डॉ. मनोहर चासकर



**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. ११ मार्च-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील पदवी, पदव्युत्तर आणि पदविका विद्यार्थ्यांसाठी तसेच सर्व माजी विद्यार्थ्यांसाठी दि. २० मार्च रोजी मेगा जॉब फेअरचे म्हणजेच रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात येत आहे. यामध्ये उद्योग क्षेत्रातील प्रतिष्ठित २० कंपन्यांचा सहभाग होणार आहे. तसेच आयटी फार्मा व इतरही विद्यार्थ्यांना कॅरिअरच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, असे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. या पत्रकार परिषदेमध्ये त्यांच्या समवेत विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. डी.डी. पवार, विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता डॉ. एम.के. पाटील, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम यांची उपस्थिती होती.

पुढे डॉ. मनोहर चासकर म्हणाले, गेल्या एका वर्षात मी या विद्यापीठाचा आणि येथील विद्यार्थ्यांचा, प्राध्यापकांचा, अभ्यासक्रमांचा बारकाईने अभ्यास केला आहे. त्यामध्ये मला असे आढळले की, आपले विद्यार्थी ज्ञानाने परिपूर्ण आहेत, गरज आहे ती त्यांना थोडे पॉलीश करण्याची त्यासाठी मी यापुढे अनेक पुढील कार्यक्रम हाती घेऊन राबविणार आहे.

लर्निंग मॅनेजमेंट ची अंमलबजावणी करण्यासाठी अध्ययन आणि अध्यापनाबरोबरच विद्यार्थ्यांचा सहभाग कसा वाढेल याकडे लक्ष देणार आहे. केंद्रीकृत डिजिटल व्यासपीठामध्ये अभ्यासाचे साहित्य, असाइनमेंट, प्रश्नमंजुषा विद्यार्थ्यांना सहज उपलब्ध करून देण्यात येतील. प्रगत अशा अमेरिका व चीन यांच्याशी सामंजस्य करार करून त्यांचा अभ्यासक्रम आपल्या विद्यापीठातील विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे. आदिवासींच्या व्यवसायांना चालना देऊन पारंपरिक संस्कृतीचे जतन करण्यात येणार आहे. गेल्या तीन वर्षात विद्यापीठाला ९१६ संशोधनपत्रे, ४० प्रकल्प, व ४४ पेटंट मिळाले आहेत. याबाबत यमनच्या राजदूतावासाकडून विद्यापीठाच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेण्यात आली आहे. इंटरप्रेथॉन २०२५ द्वारे २७ मार्च रोजी स्टार्टअप साठी हॅकॅथॉन चे आयोजन करण्यात येणार आहे. विज्ञान, तंत्रज्ञान आणि व्यवसाय यांना स्टार्टअप ची जोड देऊन कृषी ही व्यवसाय आणि वैद्यकीय पर्यटनास चालना देण्यात येणार आहे. न्यूट्रिशन आणि डायटेटिक्स या अभ्यासक्रमाचा शुभारंभ १९ सप्टेंबर २०२४ रोजी झाला आहे. याद्वारे विद्यार्थ्यांना संतुलित आहार व पोषण तत्त्वाचे महत्व कळणार आहे. दिवसेंदिवस सायबर क्राईम वाढत आहे. त्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने सायबर सेक्युरिटी हा कोर्स अनिवार्य केला आहे. यासाठी विद्यापीठाने पुणे येथील स्किल फॅक्टरी लिमिटेड यांच्या प्रणालीसोबत करार करून सर्व टेक्निकल व नॉनटेक्निकल विद्यार्थ्यांना हा अभ्यासक्रम देण्यात येणार आहे. ब्युटी आणि कॉस्मेटिक प्रशिक्षण, मोबाईल रिपेरिंग प्रशिक्षण, चित्रपट अभिनय प्रशिक्षण, स्मार्ट फोन मेकिंग प्रशिक्षण इत्यादी सारखे रोजगाराभिमुख अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना देऊन शिक्षण घेत असतानाच त्यांना स्वतःच्या पायावर कसे उभा राहता येईल, यावर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ लक्ष केंद्रित करणार आहे. शेवटी त्यांनी पुणे- मुंबई येथील विद्यार्थ्यांशी आपली स्पर्धा आहे आणि आपले विद्यार्थी त्यासाठी कुठेच कमी पडता कामा नये अशी भावना व्यक्त केली.

## संक्षिप्त वृत्त



### ट्वेन्टीवन शुगर्स युनिट ३ चा तृतीय गळीत हंगामाची सांगता

**लोहा** - तालुक्यातील शिवणी ट्वेंटीवन शुगर लिमिटेड युनिट ३ चा तृतीय गळीत हंगाम २०२४-२५ सांगता समारंभाचा कार्यक्रम टिन्टीवन कारखान्याचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख यांच्या हस्ते ९ मार्च रोजी संपन्न झाला. . यावेळी कारखान्याचे जनरल मॅनेजर सुभाष सुरवसे, सभासद, ऊस उत्पादक तसेच अधिकारी कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते ट्वेंटीवन शुगर कारखान्याच्या तिसऱ्या गळीत हंगामाच्या ९९ दिवसात ३ लाख १२ हजार ६३६ मे टन उसाचे गाळप बैलगाडी, ट्रॅक्टर, गाडी व ट्रक या वाहतुकीतून पूर्ण केल्याबद्दल उपस्थित वाहतूक ठेकेदारांचे कारखान्याच्या वतीने सत्कार करण्यात आला यामध्ये ट्रक गटातून प्रथम विलास आदमापुरे ,दुसरा गणेश कांबळे तिसरा क्रमांक मारोतराव जाधव यांनी पटकावला आहे तर ट्रॅक्टर- बैलगाडी गटातून संभाजी करेवाड,पंढरी जाधव ,शंकर मानगिर, रामराव चव्हाण, रवी चव्हाण ,आश्रुबा सर्जेराव या सर्व वाहतूकदारांचे कारखान्याच्या वतीने शाल-श्रीफळ सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला आहे. तिसरे गळीत हंगाम यशस्वी करण्यासाठी ट्वेंटीवन शुगर कारखान्याचे मुख्यशेतकी अधिकारी सचिन शिंदे ,वर्क्स मॅनेजर अजितसिंग कच्छवा, अतुल स्वामी ,डे चिफ इंजिनीयर अजितसिंह माने, सिव्हिल इंजिनियर वसंतराव कदम ऊस पुरवठा अधिकारी शिवाजी बाबर,संजय पंतगे, सुपरवायझर बालाजी आगळे, कार्यालयीन अधीक्षक व्हि.एम कुलकर्णी ,श्रीकांत काळे,रमेश भागानगरे,पंडितराव गायकवाड यांच्यासह कारखान्याचे कर्मचारी अधिकारी कामगार शेतकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋषिकेश जाधव यांनी केले आहे.

### उमरी शहर तालुक्यात शिवसेना शिंदे गटाचे सदस्य नोंदणी अभियानाला सुरुवात

**उमरी**-उमरी शहर व तालुक्यात शिवसेनेचे शिंदेगटाचे सदस्य नोंदणी अभियान शिबीरे घेवून जोमाने सुरू केले आहे. उमरी शिवसेना तालुका शाखेच्या वतीने हनुमान गल्ली परीसरात सदस्य नोंदणी अभियानाला दि १० मार्च रोजी सुरूवात करण्यात आली या सदस्य नोंदणी अभियानाला उत्फुत प्रतिसाद मिळत आहे सध्या उमरी शहरापासून शिवसेना ( शिंदे गट ) तालुक्यातील प्रत्येक गावात आणि गावातील प्रत्येक घरात शिवसेना पोहचविण्याचे कार्य स्वतः राबवून पूर्ण करणार असल्याचे तालुकाप्रमुख तथा माजी नगराध्यक्ष सुभाष पेरेवार यांनी सांगितले आहे .शिवसेना सदस्य नोंदणी अभियानाच्या कार्यक्रमास जिल्हाप्रमुख गंगाधर बडूरे , तालुकाप्रमुख तथा नगराध्यक्ष सुभाष द .पेरेवार , उपतालुका प्रमुख शिवाजी पवार , उप तालुका प्रमुख प्रवीण ढगे , दत्ता पूयड , महिला आघाडी शहर प्रमुख पार्वती दीक्षित , महिला आघाडी तालुकाप्रमुख कल्याणक विकी जाधव , माजी नगरसेविका संगीता पेरेवार, शिवानंद भालेराव सिंधीकर , नवनिर्वाचित सदस्य कांचन उमाटे ,ज्योती गव्हाणे , पुजा खांडरे, अंजनाबाई खांडरे,वंदना शिंदे ,सुनील खांडरे ,अनिल खांडरे, माधव सोळंके , कुलजित सिंग बावरी , अमोल कानोडे, रमेश लिंगमपल्ले , मारोती उमाट, साईप्रसाद पेरेवार, प्रदीप दीक्षित, व्यंकटी खांडरे आदींची उपस्थिती होती .

### व्यापारी संकुलास साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे नाव न दिल्यास आत्मदहन

**मुदखेड-** मातंग समाजाच्या विविध मागण्या संदर्भात तसेच व्यापारी संकुलास साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे नाव देण्यासाठी एल्गार पुकारण्यात आला असुन अस्मितेसाठी आत्मदहनाचा इशारा लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी यांना देण्यात आला. मुदखेड शहरात नगरपरिषदेच्या वतीने स्वतंत्र व्यापारी संकुल उभारण्यात आले आहे. परंतु गेल्या अनेक वर्षापासून व्यापारी संकुल हस्तांतरित करण्यात आलेले नाही. या संदर्भात व्यापारी संकुलास साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे नाव देण्यासाठी लोकशाही मार्गाने सन २०२१ मध्ये अमरण उपोषणही करण्यात आले होते. या उपोषणास शहरातील सर्व सामाजिक, राजकीय संघटनेनी पाठिंबा दिला होता.यानंतर आश्वासन देण्यात आले होते. तत्कालीन मुख्यअधिकारी यांनी उपोषणाची दखल घेऊन नाव देण्याचा ठराव समत केला होता.परंतु याबाबत कोणताही निर्णय झालेला नाही. मातंग समाजाच्या विविध प्रमुख मागण्या केल्या नगरपरिषद हेतू पुरसकार दुर्लक्ष करीत आहे. जिल्हा अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या लेखी निवेदनात तत्कालीन मुख्यअधिकारी यांनी दिलेल्या आश्वासानाप्रमाणे व्यापारी संकुलनास नाव देणे, पिण्याच्या पाण्याचे धोरण आमलात आणणे, साठे नगर घरकुल धारकांचा निधी वितरित करणे, मातंग समाजासाठी व्यापारी संकुलनातील तीन गाळे आरक्षित ठेवणे, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुतळ्याची शंभर फूट जागा नगरपरिषद अभिलेखात नोंद घेऊन नमुना नंबर आठची प्रत देण्यात यावी. या प्रमुख मागण्यासाठी मातंग समाजाच्यावतीने एल्गार पुकारण्यात आला आहे. याबाबत संबंधित प्रशासनाने दखल न घेतल्यास तसेच पंधरा दिवसात न्याय न मिळाल्यास आत्मदहन करण्याचा इशारा शहर युवा काँग्रेस चे सहचटणीस आकाश सोनटक्के यांनी दिला आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, लोकसभा संसद नांदेड, गृहमंत्री , पोलीस महासंचालक, विशेष पोलीस महानिरीक्षक , पोलीस अधीक्षक, पोलीस निरीक्षक मुदखेड, मुख्याधिकारी नगर परिषद मुदखेड यांना कारवाईस्तव प्रत देण्यात आली आहे.

# मुखेड येथे शासकीय वसतीगृह तर बाऱ्हाळी व कुरूळ्याला निवासी शाळा द्या : आ.राठोड

**तभा वृत्तसेवा**
**मुखेड,दि. ११ मार्च-**

मुखेड विधानसभा मतदारसंघातील मुखेड व कंधार हे डोगराळ व ऊस तोड कामगारांचे तालुके आहेत. या तालुक्यातील इतर मागासवर्गीय व अनुसूचित जाती,नवबौद्ध घटकातील हंगामी स्थलांतरित कुटुंबाची संख्या जास्त आहे. स्थलांतरित कुटुंबातील मुली - मुलांना निवासी शाळांची व वसतीगृहाची सोय नसल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने विद्यार्थ्यांचा हिरमोड होत असुन मुखेड शहरात २०० विद्यार्थी क्षमतेचे मुला - मुलिंच्या वसतिगृहास तातडीने मंजूरी द्यावी अशी मागणी मुखेड कंधार विधानसभा मतदारसंघाचे आ. डॉ तुषार राठोड यांनी राज्याचे सामाजिक न्यायमंत्री तथा नांदेडचे सह पालकमंत्री संजय शिरसाट यांच्याकडे अर्थसंकल्प अधिवेशनावेळी निवेदनाद्वारे केली आहे.

मुखेड - कंधार विधानसभा मतदारसंघामध्ये अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील घटकांची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात आहे. बृहत आराखड्यात निवासी शाळा प्रस्तावित असल्यामुळे मुखेड तालुक्यातील बाऱ्हाळी व कंधार तालुक्यातील कुरूळा येथे अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय निवासी शाळांना मंजुरी देण्यात यावी, मुखेड शहरांमध्ये सद्यास्थितीत ७५ विद्यार्थीनी क्षमतेचे मुलिंचे वसतीगृह असुन तालुक्यातील मुलिंची संख्या लक्षात घेता हे अपुरे असल्याने विद्यार्थ्यांनीची गैरसोय होत असल्याने आ.डॉ तुषार राठोड यांच्या मागणीने तालुक्यातील विद्यार्थी विद्यार्थीनी शैक्षणिक सुविधा मिळाल्याने शिक्षणाच्या मुख्यप्रवाहात येणार असल्याने शिक्षणप्रेमी नागरिकांनी आ. डॉ तुषार राठोड साहेबांच्या मागणीचे अनेकांनी समर्थन करत सोशल मीडियावर अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.



**शैक्षणिक समानता राखण्यासाठी योगदान मिळेल : शिक्षणतज्ज्ञ संदिप कांबळे**

आ. डॉ. तुषार राठोड यांनी मुखेड - कंधार विधानसभा मतदारसंघातील दुर्गम व डोगरळ भागातील मागासवर्गीय २०० विद्यार्थ्यांच्या वसतीगृहाची व बारहाळी व कुरूळा येथे निवासी शाळांना मंजुरी देण्यासाठी केलेली मागणी खुप आनंदाची गोष्ट असून अतिशय डोंगराळ भागात असलेल्या तालुक्यात दुर्लक्षित ,गोरगरीब,वंचित, तांड्यावर असलेल्या पालकांच्या पाल्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी दिलासादायक असून यामुळे शैक्षणिक समानता राखण्यासाठी योगदान मिळेल मुलांच्या भौतिक सुविधा अभावी शिक्षणात खंड पडणार नसून गुणवत्तेचा विकास होण्यास मदत होईल असे मत शिक्षणतज्ज्ञ संदिप कांबळे बिल्लाळीकर यांनी व्यक्त केले.

# खोट्या कागदपत्राआधारे फेरफार करून प्लॉट बळकावण्याचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ११ मार्च-**

वारसा हक्काने शहरातील पीर बऱ्हाण येथील न्यायालयीन वारसा पत्रा आधारे मिळालेला प्लॉट खोटे कागदपत्र सादर करून बळकावण्याचा प्रयत्न करण्यात येत असून यासाठी मदत करणाऱ्या भूमी अभिलेख कार्यालयातील अधिकाऱ्यांसह चार जनावर कारवाई करावी अशी मागणी अशी मागणी शिवकरणसिंह ठाकूर यांनी भाग्यनगर, वजीराबाद पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकाकडे केली आहे.



पीर बऱ्हाण येथील भू क्रमांक ९४५६ मधील सर्वे नंबर ५७/ए प्लॉट नंबर ८ हा प्लॉट मूळ मालक गुलाबसिंह ठाकुर आणि कलावतीबाई ठाकूर यांच्या मृत्यू पश्चात न्यायालयीन वारसा पत्रा आधारे शिवकरणसिंह ठाकुर यांच्या नावे झाला होता. प्लॉटवर त्यांचा ताबा असताना मागील काही दिवसापासून गणेश ठाकूर, दिनेशसिंह ठाकुर हे व त्यांच्या दोन बहीणी या प्लॉटवर कब्जा करण्याचा प्रयत्न करीत आहेत, मारण्याची धमकी देखील देत आहेत. त्यातच भूमी अभिलेखच्या जिल्हा अधीक्षक सीमा देशमुख यांनी खोट्या कागदपत्राच्या आधारे चुकीचा व बेकायदेशीर आदेश पारित केला आहे. याबाबत विचारणा केली असता खोट्या गुन्ह्यांमध्ये अडकवण्याची धमकी त्यांच्याकडून देण्यात येत असल्याचेही शिवकरणसिंह ठाकूर यांनी दिलेल्या निवेदनात म्हणटले आहे. म्हणने ऐकून न घेता एकतर्फी पद्धतीने चुकीचा निर्णय देऊन पीआर कार्ड रद्द करणाऱ्या भूमी अभिलेखच्या अधीक्षक सीमा देशमुख, गणेशसिंह ठाकुर, दिनेश ठाकूर व दोन बहिणीवर तात्काळ कारवाई करून न्याय द्यावा अशी मागणी शिवकरण सिंह ठाकुर यांनी निवेदनाद्वारे वजीराबाद व भाग्यनगर पोलिसांकडे केली आहे. तसेच न्यायालयातही नागरिक सुरक्षा संहिता अंतर्गत तक्रार दाखल करण्यात आली आहे.

# नरसी सेवा सहकारी सोसायटीची निवडणूक प्रतिष्ठेची ठरणार ?

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव,दि. १० मार्च-**

नायगांव तालुक्यातील एकूण गावांपैकी नरसी येथील सेवा सहकारी सोसायटीचे निवडणूकीचे पडघम वाजले असुन येथील सेवा सहकारी सोसायटीच्या निवडणुकीतील उमेदवाराची अंतिम यादी ही नुकतीच जाहीर झाली असून.१३जागांसाठी२६उमेदवारांचे उमेदवारी अधिकृत पणे जाहीर झाले आहे.

येथीलस सोसायटीवर दुसऱ्यांदा वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी भाजपाचे माजी जिल्हा सरचिटणीस तथा तुळजाभवानी जिनिंग फ्रेड्रेशनचे नव निर्वाचित चेअरमन श्रावण भिलवंडे यांच्या नेतृत्वाखाली आपलं पॅनलच्या माध्यमातून जोरदार तयारीची सुरुवात केली आहे. तर दुसरीकडे भाजपाचे जिल्हा सरचिटणीस माणिक लोहगांवे,शिवसेनेचे तालुकाप्रमुख रामू भिलवंडे माजी उपसरपंच मोहनरावभिलवंडे,यांच्या नेतृत्वाखाली ग्रामविकास पॅनलच्या माध्यमातून नरसीतील शेतकऱ्यांना कर्जपुरवठा व खते, बियाणे, कीटकनाशके आणि पशुखाद्य यांसारख्या आवश्यक वस्तू पुरवठा करण्याचे व गावच्या विकासासाठी विकासची कास धरण्याचे या वेळी अभिवचन देत ग्रामविकास पॅनलउभे केले. ग्रामविकास पॅनलच्या रुपाने सत्ताधारी आपलं पॅनल पुढे एक तगडे आव्हान निर्माण केले आहे.यादोन्ही पॅनलच्या पॅनल प्रमुखांनी कुठलीच उणीव न ठेवता आपल्या कट्टर समर्थकासह अधिकृत संभाव्य उमेदवारांसह दोनसे ते तिनसे व्यक्तीसह गावात भव्य रॅलीव्दारे मतदारांच्या गाठीभेटी घेत आहेत. परंतु येथील सेवा सहकारी सोसा यटीचे ४४० मतदार मात्र यंदाच्या निवडणुकी दोन्ही गटाच्या प्रमुखांना मतदान रुपानेआशिर्वाद देण्या चे अभिवचन दिल्या जात असल्याने ग्रामविकास पॅनल चे प्रमुख व आपलं पॅनल चे प्रमुखांनी आपलाच विजय होणार या आविर्भावात जोरदार प्रचार यंत्रणेत मशूल असल्याचे सध्याचे चित्र दिसून येत असले तरी.सत्ताधारी आपलं पॅनल चे प्रमुख तथा श्री तुळजाभवानी जिनिंग फ्रेड्रेशनचे नव निर्वाचित चेअरमन श्रावण भिलवंडे नी परत एकदा सेवा सहकारी सोसायटीवर कशा पद्धतीने मतदारांची मनेजिंकून वर्चस्वप्रस्थापित करता का?अशी नरसी सह परिसरातील गावातील नागरिकामध्ये आता चांगल्याच चर्चा रंगू लागल्या आहेत. परंतु यंदाच्या वर्षातील होऊ घातलेली सेवा सहकारी सोसायटीची पंचवार्षिक निवडणूकीत सेवा सहकारी सोसायटीच्या मतदारांना विकासाचे आश्वासन देत ग्राम विकास पॅनल उभे केल्यामूळे ही सोसायटी वरील सत्ता धारी आपलं पॅनल पुढे खूप मोठे आव्हान निर्माण झाले असले तरी आपलं पॅनल पुढे यंदाची पंचवार्षिक सेवा सहकारी सोसायटीची निवडणूक प्रतिष्ठेची ठरणार आहे मतदार मात्र येणाऱ्या १६ तारखेला मतदान आशिर्वादरुपी मतदान कोणत्या पॅनलच्या पारड्यात टाकतील हे हे अंदाज बांधणे खूप कठीण झाले आहे.

# विद्यार्थ्यांच्या विकासाकरिता शिक्षणाची गरज : पाटील

**तभा वृत्तसेवा**
**कुंडलवाडी ,दि. ११ मार्च-**

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्या करिता त्याला शिक्षणाची गरज असते तसेच विद्यार्थ्यात असलेलें कला गुण अशा कार्यक्रमातून दिसुन येते असे मत चंद्रशेखर पाटील सावलीकर यांनी रामलू पब्लिक स्कूल येथे संपन्न झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी व्यक्त केले. .

या सांस्कृतिक कार्यक्रमात शाळेतील लहान बालक मराठी, हिन्दी,तेलगू असे वेगवेगळ्या गीतावर नृत्य करून प्रेक्षकाचें लक्ष वेधले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष चंद्रशेखर पाटील सावळीकर होते तर प्रमुख पाहुणे म्हणून राजेश्वर उत्तरवार जी. बी. बिरमवार,कल्याण गायकवाड व जायेवार हे होते या वेळी मान्यवरांचा सत्कार तसेच उपस्थित पत्रकारांचा सत्कार शाळेच्या वतीने करण्यात आला.

या वेळी राजेश्वर उत्तरवार यांनी बोलताना म्हणाले की शाळेचे अध्यक्ष सायारेड्डी ठक्कुरवार यांनी कुंडलवाडी सारख्या ग्रामीण भागात इग्रंजी शाळा सुरू करून कमी फिस घेऊन चांगले शिक्षण देऊन चांगले विद्यार्थी घडवत आहेत पुढेही असेच कार्य ते करत राहावे अशी भावना व्यक्त केली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष साय्यारेडी ठकूरवार यांनी केले.

# गटशिक्षणाधिकारी किसन फोले यांची उचल बांगडी करा

## जिल्हाप्रमुख विवेक देशमुख यांची शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्याकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. ११ मार्च-**

हदगावचे गटशिक्षणाधिकारी किसन फोले यांच्याकडे मागील तीन वर्षापासून प्रभारी पदभार आहे. त्यांच्या काळात मनमानी आणि अनागोंदीने कळस गाठला असून माया जमवण्यासाठी त्यांनी प्राथमिक शिक्षकांनाच प्रभारी विस्तार अधिकारी म्हणून कामाला लावले आहे. अनेक ठिकाणी अनधिकृतरित्या प्रति नियुक्त्या केल्या आहेत. या प्रकरणी जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी सविता बिरगे सुद्धा त्यांना पाठीशी घालत आहेत. अशा आशयाच्या तक्रारीचे निवेदन शिवसेना जिल्हाप्रमुख विवेक देशमुख यांनी शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांची भेटून दिले आहे.

हदगांव तालुक्यात प्रभारी गटशिक्षणाधिकाऱ्याच्या ढिसाळ खाऊ वृत्तीच्या कारभारामुळे शिक्षणाचा बोजवारा उडाला असून प्रतिनियुक्ती आणि बदल्या करण्यासाठी दलालांची चलती आहे. प्रत्यक्षात मात्र कार्यालयात एक-दोन कर्मचारी वगळता कोणीही राहत नाही. स्वतः गटशिक्षणाधिकारी तर नांदेड येथूनच कारभार बघतात. आठवड्यातून एक-दोन दिवस हदगांव तालुक्यात येऊन एखाद्या हॉटेलमध्ये बसून डील करतात. काही दिवसापूर्वी उपस्थिती पटावर विद्यार्थ्यांची संख्या कमी असल्याचे दाखवून शिक्षकांना अतिरिक्त ठरवले, आणि त्यांच्या समायोजनासाठी २०, ३० आणि ४० हजाराप्रमाणे बोली लावल्याची चर्चा आहे. मागील वर्षी विद्यार्थ्यांना शालेय गणवेश घेण्यासाठी गटशिक्षणाधिकाऱ्यांनी आपले कमिशन ठरवून नांदेडच्या एका तयार कपड्यांच्या विक्रेत्याशी हात मिळवनी करून खूप मोठा हात मारला आहे.



शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये शालेय गणवेश घेण्यासाठी प्रत्येक शाळेसाठी गटशिक्षणाधिकारी कार्यालयाकडे रक्कम उपलब्ध करण्यात आली. ही रक्कम शालेय व्यवस्थापन समितीच्या खात्यावर वर्ग करायला पाहिजे होती. परंतु तालुक्यातील एकाही शालेय व्यवस्थापन समितीला ही रक्कम वितरित करण्यात आली नाही. शालेय गणवेशाची रक्कम मागील वर्षी प्रत्येक शाळेच्या मुख्याध्यापकाच्या वैयक्तिक खात्यावर वर्ग करण्यात आली. आणि मुख्याध्यापकांनी गटशिक्षणाधिकारी यांच्या तोंडी आदेशावरून नांदेड येथील एका कपडा विक्रेत्याच्या खात्यावर चेक द्वारे दिली. कोणत्याही शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षांना किंवा पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेतले नाही उलट त्यांना माहिती सुद्धा दिली नाही अशी अनेक अध्यक्षांची तक्रार आहे.

दोन वर्षांपूर्वी जिल्हा परिषद निवडणूकीत काम केलेल्या शिक्षकांच्या मानधनाची रक्कम सुद्धा संबंधित प्रभारी गटशिक्षणाधिकारी यांनी परस्पर उचलून घेतल्याची तक्रार आहे. चालू शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी शालेय गणवेशा करिता थेट मंत्रालय स्तरावरून निविदा काढून कापड मागवण्यात आले. हे कापड हदगांव येथील गटशिक्षणाधिकारी कार्यालयाकडे पाठवले. गटशिक्षणाधिकारी कार्यालयात जागा नसल्यामुळे शिक्षणाधिकाऱ्यांनी हा कपडा जिल्हा परिषद हायस्कूल हदगांव येथे ठेवले. नंतर या कापडाला शिवून गणवेश तयार करण्यासाठी बचत गटांना निविदा काढून काम देण्याचे शासन निर्णयात नमूद केले आहे. परंतु गटशिक्षणाधिकारी हदगाव यांनी या कापडाचे एका व्यापाऱ्याकडे गणवेश शिवण्यासाठी काम दिले. यासाठी कोणतीही निवीदा वगैरे काढण्यात आली नाही. किंवा कोणत्याही बचत गटांना किंवा महिला गटांना हे काम दिले नाही हे एका व्यापाऱ्याला काम दिल्यामुळे या कामाची चौकशी झाली पाहिजे असे सुद्धा तक्रारीत म्हटले आहे.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### समदखान पठाण यांचा पहिला रोजा पूर्ण



**जिंतूर,/प्रतिनिधी :** मुस्लिम समाजात सर्वात पवित्र रमजान महिना असून येथील बाज मोहम्मद पठाण उर्फ बासुलाला यांचा मुलगा समदखान वय नऊ वर्ष या चिमुकल्याने आपल्या आयुष्याचा पहिला रोजा पूर्ण केला

सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरू झाले असून उन्हाची तीव्रता वाढली आहे मुस्लिम समाजात सर्वात पवित्र असलेला रमजान महिनात दिवसभर अन्न व पाण्याचा पूर्णपणे त्याग करून उपवास म्हणजे रोजा ठेवला जातो समदखान यांनी आपल्या आयुष्याचा पहिला रोजा पूर्ण केल्याबद्दल फुलगुच्छ देऊन त्याचा सत्कार करण्यात आला यावेळी वडील बाज मोहम्मद उर्फ बासूलाला , काका रईसखान, टीकाखान ,बाबाखान ,मोसीनखान,आसेफखान,आजी मैमुन्नीसा बेगम ,आई व परिवारांनी कौतुक व अभिनंदन केले.

### परभणी येथे राज्य परिवहन महामंडळात सुरक्षा रक्षक भरतीचे आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी :** ट माजी सैनिक महामंडळ, पुणे (मेस्को) मार्फत परभणी येथील राज्य परिवहन महामंडळात सुरक्षा रक्षक पदाच्या ३ जागा भरायच्या . इच्छुक माजी सैनिक, त्यांचे पाल्य, पत्नी, विधवा आणि पॅरा मिलिटरी फोर्सच्या सदस्यांनी उमेदवारांनी १७ मार्च, २०२५ पर्यंत खालील क्रमांकावर संपर्क साधावा. म्हस्के पंडित सोपान (मेस्को पर्यवेक्षक) (९६०७४५५६०६०), जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, परभणी (०२४५२-२२०३४०) असे निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले .

### शिकाऊ उमेदवारी भरती मेळावा सोमवारी

**परभणी,/प्रतिनिधी:** मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचना केंद्र, द्वारा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने प्रधानमंत्री राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी व प्रधानमंत्री इंटर्नशिप मेळाव्याचे आयोजन सोमवार (दि.१७) रोजी सकाळी १० वाजता औद्योगिक प्रशिक्षण संस्था, परभणी येथे केले . या मेळाव्यामध्ये सीआयई ऑटोमोटीव्ह इंडिया लि. पुणेच्या माध्यमातून आस्थापनामध्ये शिकाऊ उमेदवार भरती केली जाणार . निवडीनंतर या उमेदवारांना १६ ते १८ हजार रुपये प्रतिमाह विद्यावेतन दिले जाणार . तरी जिल्ह्यातील फिटर, मशिनिस्ट्र टर्नर, ग्राईंडर, सीएनसीशी संबंधित या व्यवसायातील आयटीआय उत्तीर्ण व शेवटच्या वर्षात असलेल्या उमेदवारांनी या मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक प्रशिक्षणार्थी सल्लागार, मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र, परभणी यांनी केले .

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
दैनिक वेबसाईट सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# अजब नगर परिषदेचा गजब कारभार

## तत्कालीन मुख्याधिकारी युवराज पौळ यांच्या आदेशाने हस्तातंरण केलेल्या लेआऊटास मंजूरी

## मिळणार का विजेचा तार अडथळा ठरणार

**जिंतूर ,/प्रतिनिधी:-** नगरपरिषद हद्दीतील शेती सर्वे नंबर ११९/अ/१ या सर्वे नंबर मध्ये लेआऊट अभिन्यास मंजूर रहिवासी प्रयोजनासाठी (प्लॉटींगसाठी) या क्षेत्राचे रेखांकन नकाशास अंतिम मंजुरीसाठी प्रस्ताव आत्माराम दुर्गादास पांडे रा. नानलपेठ, परभणी यांनी दिनांक १५ फेब्रुवारी २०२४ रोजी जिंतूर नगरपरिषद कार्यालयास प्रस्ताव दाखल केलेला होता.

त्या रेखांकनास अंतिम मंजुरी देण्यापूर्वी जमीन मालकाने रेखांकनातील रस्ता अंतर्गत जागा ७०६०.०४ चौ.मीटर. (म्हणजे ०० हेक्टर ७०.६० आर) तसेच मोकळी ( ) एकुण जागा २५३९.१४ चौ .मी. (म्हणजे ०० हेक्टर २५.२९ आर) असे एकुण ९५९९.१८ चौ.मी. (म्हणजे ०० हेक्टर ९५.९९ आर) एवढी जमीन सार्वजनिक वापरासाठी मोजणी करून नगरपरिषद जिंतूर यांच्या हक्कात कायमची विना मोबदला रूपये ०१. पैसे ००/- रूपये - (अक्षरी रूपये :- एक रूपये शुन्य पैसे) घेऊन नाममात्र किमंतीवर रेखांकन नकाशातील रस्त्याची व ( ) मोकळी जागा हस्तांतर करून घेण्याचे तत्कालीन मुख्याधिकारी, (श्री.युवराज पौळ) नगरपरिषद जिंतूर यांनी दिनांक २४ जानेवारी २०२५ रोजीचे पत्राद्वारे हस्तांतरण करून घेण्यास सहायक नगर रचनाकार सौ.प्रतिक्षा पसलवाड यांना प्राधिकृत केले होते त्यानुसार सहायक नगर रचनाकार, नगरपरिषद जिंतूर यांनी दुय्यम निबंधक कार्यालय जिंतूर यांच्याकडे हस्तांतरण/ खरेदीखत क्रमांक २६८/२०२५ - दिनांक २४ जानेवारी २०२५ रोजी हस्तांतरण/ खरेदीखत करून घेतलेले आहे याबाबत हस्तांतरण/ खरेदीखताचे प्रत्यक्ष पाहणी केली असता त्यामध्ये रेखांकन नकाशा जोडलेला नाही त्यामुळे रस्त्याची लांबी - रुंदी व मोकळी जागा ( ) कोणत्या ठिकाणी आहे याचा बोध होत नाही. परंतु नगरपरिषद कार्यालयातील रेखांकन नकाशा पाहणी केली असता मोकळी जागा ( ) चे दोन भाग (वेगवेगळ्या ठिकाणी) तुकडे पाडले गेले असुन त्या मोकळी जागा ( ) च्या जागेवरून १,३२,००० उच्च दाबाची लाईन म्हणजे हाय टेन्शन वीज पुरवठा गेलेली असुन ती सामान्यत: औद्योगिक आणि व्यावसायिक इमारतींसाठी वापरली जाते यासाठी रहिवासी प्रयोजनासाठी वापरल्या जाणाऱ्या जागेवर उच्च दाबाच्या वीज तारेचच्या खाली २७ मीटर अंदाजे ९० ते १०० फुट रूंद मोकळी जागा सोडणे आवश्यक आहे तसे रेखांकन नकाशामध्ये व जायमोक्यावर दिसुन येत नाही. ज्या तारखेला रहिवासी प्रयोजनासाठी (प्लॉटींगसाठी) वापरल्या जाणारी जागा हस्तांतरण करण्यास आदेश दिले त्याच तारखेला नुतन मुख्याधिकारी श्री.मिनीनाथ दंडवते साहेब यांनी नगरपरिषद जिंतूर येथील पदभार स्वीकारला आहे हेही विशेष . या रेखांकन नकाशामध्ये दर्शविलेला रस्ता व मोकळी जागा ( ) तसेच १,३२,००० उच्च दाबाची लाईन म्हणजे हाय टेन्शन वीज पुरवठ्याच्या तारे खालील रस्ता व मोकळी जागा ( ) हस्तांतरण खरेदीखत केलेनुसार अंतिम रहिवासी प्रयोजनासाठी (प्लॉटींगसाठी) मंजुरी देतील?



# बहिण-भावाने केली रमजान महिन्यात प्रेरणा

**सेलू/प्रतिनिधी-** रमजान महिन्यात विशेष महत्व असलेला जीवनातील पहिला रोजा (उपवास) लहान वयाच्या त्याला आयुष्य भर लक्षात राहिल अशी आनंदायी आठवण ठरते. असेच सेलू येथील गुलमोहर कॉलनी राहिवाशी चि. इब्राहिम खान मोबीन खान (वय ८) च्या बालकाने आज जीवनातील रोजा पूर्ण करून केला व बहीण कु बशीरा मोबीन पूजान (त्याय १६०) हीने पवित्र कराण बद्दल उत्सवाने साजरा करण्यात आला.



संयम व श्रद्धेचा अनुभव इब्राहिम खान याने सकाळी भले पहाटे ५ वाजता सहेरी करून उपवास सुरु केला दिवसभर कोणतेही मागणी, तक्रार न करता त्याने संयम व श्रद्धेने उपवास . यंदा रमजान ऐन उन्हाळ्यात आल्यामुळे रख रखत्या उन्हात पाण्याचा थेंब ही न पिता जवळ पास १२ ते १३ तास राहण्याची शक्ती जणू अल्लाह या दिवसा मध्ये देत असल्याची रोजा करणाऱ्यामध्ये असते. रोजा केल्यामुळे नातेवाईक व मित्र परिवार भारावून गेला.

मौलाना यांनी भाऊ बहिणीचे कौतुक केले रमजान केवळ उपवासाचे नसून ते सहन शिलतेचे, दयाळू पणाचा व ईश्वर भक्ती चा . या महिन्यात गोर गरिबांना अन्न दान करणे हे पुण्याचे काम . या उपवासाचे व कुराण पठण पूर्ण केल्याबद्दल दोघा बहीण भाऊचे मौलाना वहाब सहाबनदवी, हाजी रौफ, आमनखा, छोटे खान, मिरझा जहीर बेग, याकूब खान, हाजी निसार पठाण, अन्वर अली खान, आखेब खान डॉ सोहेल खान, पठाण अजहर खान, शेख मोहसीन, पठाण अजीम खान, शेख जहीर, शेख असीम, इरफान जमीनदार, नदीम जमीनदार, फैसलखान, यामीन खान यांनी कौतुक केले आहे

रोजा इफ्तारचे केले होते विशेष आयोजन सायंकाळी सूर्यास्ता नंतर या दोघा बहीण भावांनी मोठया आनंदाने इफ्तार . खजूर, फळे, ज्यूस घेऊन रोजा सोडण्यात आले. यामुळे कुटंबियाने पहिला रोजा असल्यामुळे आनंदाने रोजा इफ्तारचे विशेष आयोजन केले . लहान मुले इतक्या लहान वयात भक्ती भावाने उपवास व कुराण पठण करणे हे आमच्यासाठी आभिमान आहे व हा दिवस समरणात ठेवण्याचा आहे असं बोलून दाखवत . संयम व भक्तीने शिक्षण घेणे ही मोठी गोष्ट सुलेमानिया मस्जिद चे पेशमाम मौलाना वहाब सहाब ब नदवी याच्या मार्गदर्शन नुसार कु. पठाण बशीरा हिने आपल्या जीवनातील कुराण पठण पूर्ण केले. एवढ्या लहान वयात संयम व भक्तीने शिक्षण घेणे ही फार मोठी गोष्ट .

# सेलूत मागासवर्गीयवस्त्यासाठी झाले धरणे आंदोलन



**शिवाजी आकात**

**सेलू,/प्रतिनिधी :** शहरात विकास कामे केवळ उचभ्रू वसाहतीमध्ये करण्यात येत असून मागासवर्गीय वस्त्यामध्ये विकास कामे करण्यात येत नसल्याने असा दूजाभाव करण्यात येत असून मागासवस्त्यामध्ये विकास कामे करण्यात यावे यामागणीसाठी पालिकेसमोर शूक्रवार ७ रोजी धरणे अंदोलन करण्यात आले.

शहरात मागील काही महिन्यापासून विविध विकास कामे करण्यात येत आहेत त्र सदरिल विकास कामे केवळ उचभ्रू वसाहतीमध्ये करण्यात येत आहेत तसेच विकास कामे केवळ काही निवड वसाहतीमध्ये केली जात असून शहरातील मागासवर्गीय वस्त्यामध्ये ही मूलभूत सूविधाची कामे करण्यात यावीत अनेक मागासवस्त्यामध्ये रस्ते,सांडपाण्याची व्यवस्था अशी कामे प्रलंबित आहेत.मात्र याकडे प्रशासन दूर्लक्ष करत आहे.मागासवस्त्यामध्ये तात्काळ मूलभूत सूविधांची कामे करण्यासाठी धरणे अंदोलन करण्यात आले .यासाठी पँथर संघर्ष ग्रूपच्यावतिने रोहन आकात,विनोद धापसे,विकास धापसे,रोहित गायकवाड,सागर गायकवाड , स्वप्निल साळवे,धनंजय जाधव,कपिल धापसे,ऋतिक सावंत आदींनी पूढाकार घेतला होता.

# जिंतूर तालुक्यातील भुगर्भातील पाणीपातळी खाली गेल्याने विहीरीने गाठला तळ

**जिंतूर,/प्रतिनिधी:** तालुक्यातील भुगर्भातील पाण्याची पातळी खोलवर गेल्याने शेतक-यांच्या विहिरी कोरडया पडल्याचे वास्तव चित्र सध्या जिंतूर तालुक्यात दिसत . पावसाळ्यातील पडणारे पावसाचे पाणी हे निरंतर पडत नसल्याने जमिनीत पावसाचे पाणी मुरत नाही. असे जाणकार शेतक-यांनी म्हटले . जिंतूर तालुका हा डोंगराळ भाग असल्याने पडलेला पाऊस माळराणाहून सरळ वाहून जात असल्याने सध्या नदी, नाले, वडे, तलावात सुद्धा पाणी दिसून येत नाही. त्यांमुळे यावर्षी उन्हाळयात भिषण पाणी टंचाईला नागरिकासह शेतक-यांना या वर्षी सामोरे जावे लागत आहे..



ज्वारी, तिळ, भाजीपाला, फळपिके, फुलपिके यांसारखी पिके पाण्याअभावी करपुण जात . जलजीवन योजनेचे सुद्धा काम रखडल्याने पाणी पुरवठा करणारी नळयोजना अपुर्ण असल्याने गाव तांडयात प्रचंड पाणीटंचाई होत . ग्रामीण भागातील विधन विहिरी, कुपनलिकेचे पाणी आटले . पाणीटंचाई आराखडा बैठकीत घेतलेले निर्णय लवकर अंमलात आणून नागरीकांचा पाणी प्रश्न ताबडतोब सोडवावा अशी मागणी जनतेतुन होत . तसेच तालुक्यातील १३६ ग्रामपंचायत पैकी बोटाव मोजण्याइतक्याच गावच्या ग्राम पंचायतचे पाणी फिल्टर एक शोभेची वस्तू बनली असून फिल्टर २-४ महिने चालू होते . परंतु गेल्या काही महिन्यापासून बंद असल्याने ते फिल्टर एक शोभेची वस्तू बनली . तसेच मार्च महिना लागला असून तापमान ३५ अंशापर्यंत गेले असल्याने व सूर्य आग ओकत असल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत .

### प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेच्या वॉटरशेड रथ यात्रेस हिरवा कंदील

**परभणी,/प्रतिनिधी:-.** प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत केंद्र शासनाच्या भूमी संसाधन विभाग ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार व मृद व जलसंधारण विभाग, ट शासन व वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली सावंगी म्हाळसा व मानकेश्वर येथे गुरुवार (दि.६) रोजी वॉटरशेड रथास हिरवा झेंडा दाखवून सुरुवात झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपजिल्हाधिकारी रोहयो श्रीमती संगिता चव्हाण तर प्रमुख उपस्थिती श्रीमती श्वेता नारायण (वॉटर शेड यात्रा ऑब्झर्वर, दिल्ली) तसेच जिल्हा जलसंधारण अधिकारी कविराज कुच्चे, सहायक जिल्हा जलसंधारण अधिकारी बी. के. पाटील, सहायक जिल्हा जलसंधारण अधिकारी दौलत चव्हाण, तहसीलदार राजेश सरवदे, उप विभागीय जलसंधारण अधिकारी एस.डी. मोडवन उपस्थित .

यावेळी सावंगी म्हाळसा येथे केंद्र शासनचे वॉटरशेड यात्रा मोबाईल व्हॅनचे आगमन झाले. या वॉटरशेड यात्रा कार्यक्रमात जि.प. शाळेतील विद्यार्थी यांनी लेझिमद्वारे मान्यवरांचे स्वागत केले.

यावेळी उपस्थित प्रमुख पाहुणे यांनी, श्री. सर्जे यांच्या सह जलसंधारण अधिकारी व कर्मचारी परभणी-सेलू, तालुका कृषी अधिकारी जिंतूर, तालुका कृषि उत्पन्न बाजार समितीचे सचिव कर्मचारी, सावंगी-म्हाळसाचे मुख्याध्यापक, सिस्टिम ॲडमिन आणि प्रकल्पातील पाणलोट विकास पथक कृषी तंज्ञ, सिव्हिल इंजिनिअर, शिक्षक, उमेद,आत्मा, जिल्ह्यातील संस्था व गावातील युवक, शेतकरी, महिला बचत गट उपस्थित .

कार्यक्रमाचे प्रास्तविक जिल्हा जलसंधारण अधिकारी के.जे. कुच्चे यांनी केले तर सूत्र संचालन सतिश कटारे यांनी केले. तसेच उपस्थित सर्व मान्यवर यांनी पाणलोट संकल्पना या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमा दरम्यान येथील उपस्थित ग्रामस्थ यांना मृद व जलसंवर्धनाची शपथ देण्यात आली. पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले, प्रश्नमंजुषा, क्विझ कार्यक्रम व विजेत्यांना पारितोषिक वाटप, यावेळी निबंध, रांगोळी स्पर्धेतील विजेते व पाणलोट योद्धा व धारिणीताई यांना मान्यवरांच्या यांचे हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते पाणलोट योजनेतून मंजूर असलेल्या एनआरएम कामाचे भूमिपूजन करण्यात आले व योजनेतून पूर्ण झालेल्या एनआरएम कामाचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी श्रमदान व वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# पालिकेच्या निष्क्रिय कारभारामुळे नागरिकांवर पाणी टंचाईचे सावट सेलू शहराचा पाणीपुरवठा रखडला, १ कोटी रुपयांची थकबाकी

**शिवाजी आकात**

**सेलू,/प्रतिनिधी-** येथील नगरपालिक पालिकेकडे जालना पाटबंधारे विभागाची १ कोटी २ लाख ९१ हजार नळपट्टीची रक्कम थकल्याने १० मार्च रोजी पंप हाऊसला टाळे ठोकून शहराचा पाणी पूरवठा खंडीत केला आहे सेलू शहराला निम्म दूधना प्रकल्पाच्या जलाशयातून पाणी पूरवठा करण्यात येतो. सेलू पालिकेला थकीत नळपट्टी संदर्भात वारंवार पत्र व्यवहार करून ही पालिकेने दूर्लक्ष केले .रिणामी कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग जालना यांच्या आदेशानूसार शहराचा पाणी पूरवठा खंडीत केला आहे त्यामूळे शहराला पाणीटंचाईचा सामना करावा लागणार .



शहराला निम्न दुधना प्रकल्पातून पाणीपुरवठा केला . जलाशयातील १५ इंटक वेलमधून देवला येथील पंप हाऊस येथे पाणी आणून जलशुद्धीकरण केंद्रातून शहरातील चार जलकुंभांत पाणी सोडले जाते. शहरात ७ हजार १०० नळधारक . विविध भागांतील जलकुंभांतून झोननिहाय शहराच्या विविध भागांत तीन दिवस पाणीपुरवठा केला . नगरपालिकेकडे निम्न दुधना पाटबंधारे विभागाची नळपट्टीची १ कोटी २ लाख ९१ हजार थकबाकी . मार्चच्या पार्श्वभूमीवर विविध शासकीय कार्यालयांकडून थकबाकी वसुली मोहीम राबविली जात . निम्न दुधना पाटबंधारे विभागाने ही नळपट्टीची थकबाकी वसुली करण्यासाठी नगरपालिकेला १० मार्चपर्यंत मुदत दिली होती त्र पालिकेने या मूदतीकडे दूर्लक्ष करून थकीत नळपट्टी रक्कमेचा भरणा केला नाही. नगरपालिकेकडूनही शहरातील मालमत्ता व नळधारकांकडून थकबाकी वसुली केली जात . दरम्यान,रमजान महिना व मार्च महिन्यात उन्हाचा कडाका वाढला असून, त्यातच नगरपालिकेने नळपट्टीचा भरणा न केल्यास पाणीपुरवठा खंडित केल्याने शहरवासीयांना पाणीटंचाईचा सामना करावा लागण्याची शक्यता निर्माण झाली .

# नागनाथ संस्थान न्यासाच्या भ्रष्ट कारभाराची चौकशी करण्याची मागणी

## तहसीलदारांना माजी विश्वस्त आणि भाविकांचे निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ मार्च**
श्रीक्षेत्र औंढा नागनाथ येथील नागनाथ (देवस्थान) संस्थान या न्यासाच्या भ्रष्ट कारभाराची चौकशी करून विश्वस्त मंडळाच्या नियुक्तीची कारवाई करण्याच्या संदर्भात नागनाथ देवस्थानचे अध्यक्ष तथा तहसीलदार हरीश गाडे यांना माजी विश्वस्त व भाविकांच्यावतीने निवेदन देण्यात आले आहे.

सदरील निवेदनामध्ये अस्ताव्यस्त व बेशिस्त झालेल्या आणि कोणाचाही अंकुश नसलेल्या श्री नागनाथ संस्थान औंढा ना. या न्यासाच्या भ्रष्ट कारभाराची चौकशी करुन विश्वस्त मंडळाच्या नियुक्तीची कार्यवाही करणे, दिवसेंदिवस नागनाथ संस्थानचा कारभार व व्यवस्थापन हे भ्रष्टाचाराच्या विळख्यात व बेसिस्त व अस्थाव्यस्तपणे होत असुन कोणाचाही कोणावर अंकुश नाही त्यामुळे येणाऱ्या भाविकांना मंदिर पश्चिमव्दारा जवळील अतीक्रमण, भाविकाभोवती पडणारा बेलफूलवाल्याचा गराडा, अभिषेक पुजा करण्यासाठी पुरोहीतांचा तगादा, दर्शनासाठी गेल्यावर तेथील पुजाऱ्यांचा दक्षणेसाठी आग्रह, त्वरीत दर्शनासाठी सुरक्षा कर्मचाऱ्याकडुन पैशाची मागणी, फोटो काढुन घ्या म्हणुन अवैध फोटोग्राफरची मागणी या व अशा अनेक समस्यांना त्यांना सामोरे जावे लागते ही वस्तुस्थिती आहे. न्यासाच्या व्यवस्थापनाबाबत व भ्रष्ट कारभारा बाबत चौकशी करुन तात्काळ विश्वस्त मंडळ नियुक्ती बाबत कार्यवाही संदर्भात भ्रष्ट व अवैध व्यवस्थापनाच्या अनुषंगाने माहीतीच्या अधिकाराखाली माहीती संदर्भात अर्ज दिला ज्याची माहीती मिळाली नाही.

सद्यस्थितीत न्यासाचे मासीक उत्पन्न ४ ते ५ लाख रुपये आहे तर कर्मचारी पगार हा मासीक ६ ते ७ लाख रुपये आहे शिवाय इतर खर्च वेगळा त्यामुळे न्यास हा आर्थीक गर्तेत जात आहे. याचे एकमेव कारण म्हणजे कर्मचाऱ्यांची अवैध भरती व अवैध मानधन आनखीनही भर्ती चालुच आहे याचे कारण समजत नाही. सद्यस्थीतीत ७० ते ७५ कर्मचारी आहेत. कार्यरत कर्मचाऱ्यापैकी काही कर्मचारी नुसती हजेरी रजिस्टरवर सही करतात, डयुटी करीतच नाहीत, फक्त पगार उचलतात हे सत्य आहे. काही दिवसा पुर्वी मंदिरातील भंगार सामान हे चोरुन नेत असतांना पकडण्यात आले परंतु काही वरिष्ठ कर्मचाऱ्यांनी त्यात चिरीमीरी घेडुन ते प्रकरण मिटविले याची सध्या जोरात चर्चा आहे सत्यता आपण तपासावी. सद्यस्थीतीत न्यासाचा कारभार अत्यंत भ्रष्ट व अस्ताव्यस्त झाला आहे. त्यासाठी सखोल चौकशी करावी व दोषीवर कडक कार्यवाही करावी. अन्यथा लोकशाहीच्या मार्गाने जन आंदोलन करावे लागेल अथचस कार्यालयासमोर उपोषणास बसण्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे निवेदनावर माजी विश्वस्त पांडुरंग पाटील, माजी विश्वस्त मुंजाजी गोबाडे, माजी विश्वस्त माणिकराव पाटील, माजी विश्वस्त गणेश देशमुख, माजी विश्वस्त विलास काळे, माजी विश्वस्त नागनाथ पंडित, माजी विश्वस्त निळकंठ देव, पुरुषोत्तम लांबडे( भाविक) मारोती मगर, जी डी मुळे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## महिला व बालकांच्या मदतीसाठी हेल्पलाईन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ मार्च**
महिला व बालकांच्या मदतीसाठी देण्यात आलेल्या सर्व हेल्पलाईनची माहिती ग्रामपंचायत, नगर परिषद, नगर पंचायत व पंचायत समितीस्तरावर जनजागृती करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी दिल्या आहेत. त्याअनुषंगाने महिलांसाठी राष्ट्रीय महिला हेल्पलाईन-१८१, संकटात असलेल्या महिलांसाठी हेल्पलाईन-१०९१, राष्ट्रीय महिला आयोग हेल्पलाईन-७८२७१७०१७०, राज्य महिला आयोग हेल्पलाईन-१५५२०९ आणि आपत्कालीन प्रतिसाद क्रमांक-११२ या हेल्पलाईन आहेत. तर बालकांसाठी १०९८ ही हेल्पलाईन आहे, अशी माहिती जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, हिंगोली यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

## सेनगाव पंचायत समितीतील गैर व्यवहार प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ मार्च**
सेनगाव पंचायत समितीतील ४३.७७ लाखांच्या गैरव्यवहार प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला आहे. याबाबतचे आदेश पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी काढले आहेत.

सेनगाव पंचायत समितीमध्ये सन २०१९-२० ते २०२२-२३ या आर्थिक वर्षातील कंत्राटदारांकडून कपात केलेली कराची रक्कम, कामगारांची विमा रक्कम संबंधित विभागाच्या बँक खात्यावर जमा न होता वैयक्तिक बँक खात्यावर जमा करण्यात आली आहे. या प्रकरणात मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिगंबर माडे यांनी चार जणांचे स्वतंत्र चौकशी पथक स्थापन करून या रकमांची चौकशी सुरू केली आहे. या चौकशीमध्ये बँकाना देण्यात आलेले धनादेश, बँकाकडून वैयक्तिक खात्यात जमा झालेले धनादेश याची माहीती घेण्यात आली आहे. या शिवाय धनादेशासोबत बँकेकडे देण्यात आलेल्या शेड्यूलची माहीती देण्यात आली आहे. या प्रकरणाच्या चौकशीमध्ये ४३.७७ लाख रूपयांचा गैरव्यवहार झाल्याचे स्पष्ट झाले आहे. याप्रकरणी सेनगावचे गटविकास अधिकारी माधव कोकाटे यांनी सेनगाव पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून सहायक लेखाधिकारी नितीन बंडाळे, दत्तात्रय शिंदे, लेखाधिकारी अनिल गव्हाणकर, नितीन शर्मा यांच्याविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.

दरम्यान, या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी या प्रकरणाचा तपास सेनगाव पोलिसांकडून काढून घेत आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपविला आहे. आर्थिक गुन्हे शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक विजय रामोड, उपनिरीक्षक रामराव पोटे, जमादार विलास सोनवणे यांच्या पथकाने अधिक तपास सुरू केला आहे. पोलिसांनी आरोपींच्या अटकेसाठी स्वतंत्र पथके स्थापन केली आहेत.

## बोथी, कुंभारवाडीत पाणलोट यात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ मार्च**
प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत केंद्र शासनाच्या भूमी संसाधन विभाग ग्रामीण विकास मंत्रालय भारत सरकार व मृद व जलसंधारण विभाग महाराष्ट्र शासन व वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा यांच्या संयुक्त विद्यमाने व जिल्हाधिकारी अभिनव गोयल, जिल्हा जलसंधारण अधिकारी प्रफुल्ल खिराडे यांच्या मार्गदर्शनाखाली कळमनुरी तालुक्यातील मौजे-बोथी व कुंभारवाडी येथे पाणलोट (वाटरशेड) यात्रा घेण्यात झाली.

या पाणलोट (वाटरशेड) यात्रेचे गावातील महिलांच्या हस्ते पूजन करण्यात आले. तसेच मान्यवरांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून गावात प्रभात फेरी काढण्यात आली. पाणी की पाठशालामध्ये पाणलोटावर शाहीर धमांनद इंगोले यांनी विविध गिते व पथनाट्य सादर केले. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी राजेंद्र कदम, उपविभागीय जलसंधारण अधिकारी विकास यचावाड, रोहिणी शिंदे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे उदघाटक जयाजी पाईकराव हे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बोथीचे सरपंच मोहनराव बोथीकर हे होते. अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम, रोहिणी शिंदे, जयाजी पाईकराव, एमएसआरएलमच्या श्रीमती कटके यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक तालुका कृषी अधिकारी महादेव कुंभार यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कृषी सहाय्यक स्वप्नील यांनी केले तर आभार प्रदर्शन जिल्हा प्रकल्प समन्वयक एच.आर.नाईक यानी मानले. या कार्यक्रमात श्रमदान, वृक्ष लागवड, एनआरएम कामाचे भूमीपूजन व लोकार्पण करण्यात आले. याप्रसंगी पाणलोट योध्दा, धारणीताई व शालेय मुलांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व ट्राफीचे वितरीत करण्यात आले. तसेच उपस्थित सर्वाना मृद व जलसंधारणाची शपथ देण्यात आली. कार्यक्रमाला संतोष काळेगोरे, विनायक कोळेकर, कृषी विभागाचे सर्व अधिकारी कर्मचारी व विविध स्वयंसेवी संस्थाचे अध्यक्ष, सचिव तसेच विभागातील अधिकारी व कर्मचारी, आत्मा बी टी, उमेदचे कर्मचारी, तलाठी, ग्रामसेवक, आशाताई, गट समन्वयक, ग्रामपंचायत सरपंच व पाणलोट समिती सदस्य, ग्रामस्थ, शाळेतील विद्यार्थी, युवक, महिला आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**हिंगोली- शहरातील भाजीमंडई परिसरातील गाळ्यांसमोर मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे ढिग जमा झाले असून याठिकाणी मोठी दुर्गंधी पसरली आहे. भाजीमंडईतील ही गाळे नेहमीच बंद असल्यामुळे या ठिकाणी प्लास्टीकच्या बॅग्स तसेच सडका भाजीपाला आणून टाकल्या जात आहे. यावर नगर परिषदेने कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी होत आहे. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### २२ मार्चला राष्ट्रीय लोकअदालत

हिंगोली- येथील जिल्हा न्यायालयात व त्या अंतर्गत येणाऱ्या विविध न्यायालयात तालुका विधी सेवा समिती व वकील संघाच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दिनांक २२ मार्च, २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता न्यायालय परिसरात राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या लोकअदालतीमध्ये भूसंपादन व मोटार अपघात नुकसान भरपाई प्रकरणे, तडजोड युक्त फौजदारी प्रकरणे, दिवाणी प्रकरणे, वैवाहिक/ कौटुंबिक वाद प्रकरणे, पराक्रम्य अभिलेख अधिनियमचे कलम १३८ खालील प्रकरणे, वाद दाखल पूर्व प्रकरणे इत्यादी खटले तडजोडीसाठी ठेवण्यात आली आहेत. ही सर्व प्रकरणे आपआपसातील तडजोडीद्वारे निकाली काढता यावीत. यासाठी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या राष्ट्रीय लोकअदालतीचा जास्तीत जास्त पक्षकार मंडळींनी उपस्थित राहून फायदा घ्यावा, असे आवाहन तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर जी. के. नंदनवार, वकील संघाचे अध्यक्ष ॲड. एस. आर. भुक्तर, सचिव ॲड. अकील अहेमद यांनी केले आहे.

### मधुकर खाडे यांची तालुकाध्यक्षपदी निवड



कोनाथा- वसमत तालुक्यातील हयातनगर येथील मधुकर रानबा खाडे यांची नुकतीच लोककलावंत मंच वसमत तालुका अध्यक्ष पदी ८ मार्च रोजी परभणी येथे निवड झाली असून ही सांस्कृतिक क्षेत्रातील गायक तसेच कलावंत म्हणून सामाजिक योगदान अतुलनीय असल्यामुळे त्यांची निवड झाली आहे. ही निवड लोककलावंत सांस्कृतिक मंचाचे प्रदेश अध्यक्ष विष्णू शिंदे यांनी केली आहे. निवडीचे पत्र देण्यात आले आहे. आपल्या कलेद्वारे समतावादी विचारांचा प्रचार व प्रसार करण्यात यावा व हे सामाजिक हित डोळ्यासमोर ठेवून लोककला अविरत सुरू ठेवण्यासाठी प्रयत्न करावेत असे या पत्रात उल्लेख केला आहे. या निवडी वेळी सुदाम जाधव, बाळासाहेब कांबळे, किशोर गिरी, निळकंठ करवंदे, एकनाथ खाडे, शाम सारंग आदी उपस्थित होते.

### ७२ वाहन चालकांविरूध्द कारवाई

हिंगोली- अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ७२ वाहनचालकांविरूध्द हिंगोली पोलिसांनी कारवाई करीत त्यांचेकडून ५३ हजाराचा दंड वसुल केला आहे तसेच दारूबंदी कायद्यांतर्गत जिल्ह्यात चार ठिकाणी पोलिसांनी छापे मारून ४६४० रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

## गुरूदेवा इंग्लीश स्कूलमध्ये वार्षिक स्नहेसंमेलन उत्साहात संपन्न




**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ११ मार्च**
विद्यार्थीच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव मिळाला पाहिजे या अनुषंगाने शहरातील गुरुदेव इंग्लिश स्कूलच्या प्रांगणात वार्षिक स्नेहसंमेलन उत्सव मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला.

यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटक विष्णुकांत नवघरे हे होते तर अध्यक्षस्थानी प्रा. रमेश मानवते होते. प्रमुख पाहुणे म्हणून क्रुष्णा देशमुख, रवि भुसावळ, संदिप सुर्यवंशी हे होते.या वेळी गुरुदेवां इंग्लिश स्कूलचे संस्थापक अध्यक्ष राजकिरण बोगेवार यांच्या मार्गदर्शनाखाली व प्राचार्य देविका बोगेवार यांच्या पुढाकाराने कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. मुलांना शिस्त लागावी यासाठी पालकांनी मुलांचा होमवर्क पाहणे, प्रत्येक पालक सभेला उपस्थित राहणे, प्रगती तपासने या माध्यमातून शाळा व पालक एकमेकांच्या संपर्कात राहतील व वैचारिक देवाणघेवाण वाढेल असा मानस आहे. चिमुकल्यांनी अनेक गाण्यावर नृत्य सादर केले तर पालकांचाही उदंड प्रतिसाद मिळाला. संस्थापक अध्य क्ष राजकिरण बोगेवार यांनी मार्गदर्शन केलं. यावेळी विविध स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. सुत्रसंचालन भारत क्यादलवार, वैष्णवी टोंपे यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सौ. खंदारे, सौ जाधव,बोंगाने, गोडघासे, पुजा जाधव, श्रीरामवार, दुमाने, नादरे, शिवानी साळवे, आडेपवार, जना यांनी परिश्रम घेतले तर आभार प्रदर्शन प्राचार्य देविका बोगेवार यांनी मानले.

## काँग्रेसचे माजी आमदार भाऊराव पाटील गोरेगावकर घेणार धनुष्यबाण हाती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ मार्च**
काँग्रेस पक्षाचे माजी आमदार भाऊराव पाटील गोरेगावकर हे शिंदे गटात प्रवेश करणार असल्याचे निश्चित झाले असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत हिंगोलीत होणाऱ्या मेळाव्यात प्रवेश करणार आहेत. त्यामुळे हिंगोली विधानसभा मतदारसंघातील काँग्रेसची ताकद कमी होणार आहे.

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचे माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर यांना डावलून ही जागा महाविकास आघाडीने उबाठा शिवसेनेला दिली. त्यामुळे तीनवेळा काँग्रेसकडून विजयी झालेले माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर चांगलेच नाराज झाले होते. त्यांच्या समर्थकांनी त्यांना या निवडणुकीत अपक्ष उभे केले होते. परंतु विधानसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला होता. भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांचे प्रतिस्पर्धी असलेले भाऊराव पाटील गोरेगावकर आता शिंदे गटात प्रवेश करणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. महायुतीची सत्ता असल्यामुळे त्यांना सत्तेत सामील करून त्यांचे पुर्नवसन करणार का असाही कयास लावला जात आहे.

मागील काळात जिल्ह्यात काँग्रेसमध्ये दोन गटात पडल्यामुळे माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर यांच्यावर अन्याय झाला. विरोधी गट असलेल्या विधान परिषदेच्या सदस्या डॉ प्रज्ञा सातव आणि माजी आ. गोरेगावकर यांच्या गटातटाच्या राजकारणामुळे जिल्ह्यात काँग्रेसची अवस्था बिकट झाली आहे.

दरम्यान, हिंगोली विधानसभा ममतदारसंघावर मजबुत पकड असलेले माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर आता शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. काही दिवसांपूर्वी त्यांच्या समर्थकांची बैठक पार पडली. यावेळी त्यांनी समर्थकांशी चर्चा करीत शिंदे गटात प्रवेश करण्याचे निश्चित केले असल्याचे समजते. त्यांच्या पक्ष प्रवेशामुळे विधानसभा मतदारसंघात शिवसेनेला चांगले बळ मिळणार असल्याचे दिसत आहे.

## पोलिस अधीक्षक कार्यालय परिसरात कर्मचाऱ्यांकडून स्वच्छता मोहीम



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ मार्च**
येथील जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालय आणि परिसरात मंगळवारी पोलिस अधिकारी आणि कर्मचारी यांनी स्वच्छता मोहीम राबवून सुमारे दहा ट्रॅक्टर कचरा डंपींग ग्राऊंड येथे कचरा व्यवस्थापनासाठी पाठविण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १०० कलमी कार्यक्रमांतर्गत शासकीय कार्यालय व परिसराची स्वच्छता हा महत्वाचा मुद्दा असून त्याअनुषंगाने पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दि ११ मार्च रोजी पोलिस अधीक्षक कार्यालय व परिसरात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वच्छता मोहीमेत सहभाग घेतला. यावेळी परिसरातील काटेरी झुडुपे, केरकचरा, पॉलीबॅग तसेच खराब झालेले पेपर व मोठ्या प्रमाणात साचलेला सुका पालापाचोळा, वाळलेले गवत यांची पूर्णपणे स्वच्छता कर्मचाऱ्यांनी केली. सुमारे दहा ट्रॅक्टर कचरा गोळा करण्यात आला. सदरील मोहीम वेळोवेळी घेण्यात येणार असल्याचे यावेळी सुत्रांनी सांगितले. या मोहीमेत स्थानिक गुन्हे शाखा, सायबर सेलचे अधिकारी, अंमलदार, नगर पालिकेचे सफाई कर्मचारी सहभागी झाले होते.

## महिला बचतगटाच्या तीन दिवशीय विक्री प्रदर्शनाचा समारोप

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ मार्च**
महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने नव तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प अंतर्गत महावीर भवन येथे दि. ८ मार्च ते १० मार्च तीन दिवसीय महिला बचतगट विक्री प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. त्याचा समारोपीय कार्यक्रम आज घेण्यात आला.

या कार्यक्रमाला प्रमुख मान्यवर महिला व बालविकास अधिकारी राजाभाऊ व अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापक बालाजी शिंदे हे उपस्थित होते. यावेळी बोलताना जिल्हा महिला व बालविकास अधिकारी श्री. मगर यांनी महिलांनी अधिक चांगल्या प्रकारे आपले व्यवसाय करुन आर्थिक प्रगती साधावी, असे प्रतिपादन केले. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापक बालाजी शिंदे महिलांना अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत विविध योजना आणि त्या करिता लागणारे कागदपत्र याबाबत मार्गदर्शन केले. जिल्हा प्रकल्प सल्लागार गजानन खिरोडकर यांनी महिलांनी आपले व्यवसाय अधिक चांगले कसे करता येतील याबाबत मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप जिल्हा समन्वय अधिकारी विलास जगताप यांनी केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सीएमआरसी व्यवस्थापक विलास पंडित यांनी केले तर आभार स्वप्नपूर्ती सीएमआरसीचे व्यवस्थापक सुनील चव्हाण यांनी केले.या कार्यक्रमांमध्ये उत्कृष्ट महिला बचत गटांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच या प्रदर्शनीमध्ये इतर सहभागी महिला बचतगटांचा देखील मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाकरिता सर्व व्यवस्थापक, लेखापाल, विकास सल्लागार तसेच, सर्व सहयोगीनीपी परिश्रम घेतले.

# बीड जिल्ह्यासाठी आनंदाची बातमी नवीन रेल्वेमार्ग सर्वेक्षणास निधी मंजूर!

## धाराशिव-बीड-संभाजीनगर रेल्वे मार्ग होणार, रेलबोर्डाचे चेअरमनसोबत खा.सोनवणेंनी केली ऑनलाईन पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ मार्च**

उस्मानाबाद (धाराशिव)-बीड-औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) रेल्वे लाईन प्रकल्पाला मंजुरी देण्याची मागणी निवडून आल्यापासून खा. सोनवणे हे सातत्याने रेल्वेमंत्री व रेल बोर्डाकडे करत आहेत. या मागणीची दखल घेत रेल्वेमार्गाची तपासणी करण्याचे आदेश दि. १० फेब्रुवारी रोजी रेल्वे मंत्री यांनी संबंधित संचालकांना दिले होते. आता संबधित रेल्वे मार्गाचे सर्व्हेक्षण करण्यास मंजूरी देण्यात आली असून सर्व्हेक्षणासाठी रु. ६ कोटी निधीस मंजुरीचे आदेश देण्यात आले आहेत. रेल्वे बोर्डाचे चेअरमन सतिश कुमार यांच्या कार्यालयात खा.सोनवणे यांनी रेल्वे मार्गाची ऑनलाईन पाहणी केली.

खा.बजरंग सोनवणे यांनी दि.१० फेब्रुवारी रोजी केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांना भेट घेतली होती. यावेळी उस्मानाबाद-बीड-औरंगाबाद नवीन मार्ग प्रकल्पाचा अहवाल रेल्वे बोर्डाला सादर करण्यात आलेला असून या प्रकल्पाची एकूण लांबी २४०.१५ किमी आहे. ज्याचा अंदाजे खर्च ४८५७.४७ कोटी रुपये असल्याचे निदर्शनास आणून दिले. मराठवाडा प्रदेशात अखंड कनेक्टिव्हिटी प्रदान करण्यासाठी, प्रवासाचा वेळ कमी करण्यासाठी आणि व्यापार आणि उद्योगासाठी नवीन मार्ग उघडण्यासाठी हा रेल्वे मार्ग महत्त्वाचा आहे, हे पटवून दिले होते. केंद्रीय रेल्वेमंत्री यांनी पत्राव्दारे या प्रकल्पास मंजुरी देण्याबाबत प्रकल्पाची व्यवहार्यता व सुविधा तपासणी करण्याचे निर्देश संबंधित संचालक यांना दिले होते. यानंतर आता केंद्र



सरकारच्या रेल्वे मंत्रालयाने धाराशिव (उस्मानाबाद)-बीड-छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद) या २४० किमी नवीन रेल्वे मार्गांसाठी अंतिम सर्वेक्षणास मंजुरी दिली आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांसाठी ६ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. हा रेल्वे मार्ग मराठवाड्याच्या दळणवळणाच्या सोयींमध्ये मोठी क्रांती घडवेल आणि विकासाला गती देणार आहेच पण बीड जिल्ह्याच्या तसेच मराठवाड्याच्या प्रगतीसाठी हा महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे. हा रेल्वेमार्ग व्हावा, यासाठी खा.बजरंग सोनवणे हे जुलै २०२४ पासून (उस्मानाबाद) धाराशिव-बीड-छत्रपती संभाजीनगर ( औरंगाबाद) अशा २४० किलोमीटर नवीन रेल्वेमार्गाच्या मागणीसाठी सातत्याने रेल्वे मंत्री व रेल बोर्डाकडे पाठपुरावा करत आहेत. आज मंगळवार दि.११ मार्च रोजी रेल बोर्डाचे चेअरमन सतिषकुमार यांचे सोबत या रेलमार्गाची ऑनलाईन पाहणी केली.

बीडला मराठवाड्यातील सर्वात मोठे जंक्शन

पुर्व-पश्चिम रेल्वे मार्गाचे काम सुरू आहेच पण आता दक्षिण-उत्तर रेल्वेमार्गाचेही सर्वेक्षण होत असून या कामाला गती मिळेल. दोन्ही रेल्वे मार्ग झाल्यास बीडमध्ये मराठवाड्यातील सर्वात मोठे जंक्शन होणार आहे. अहिल्यानगर-परळी रेल्वेमार्गाबरोबरच धाराशिव-बीड-संभाजीनगर रेल्वेमार्गही बीड जिल्ह्यासाठी विकासाच्या दृष्टीने मोठा फायदेशीर ठरणार आहे.

रेल्वे बोर्डाचे चेअरमन सतिश कुमार यांच्या कार्यालयात रेल्वे मार्गाची ऑनलाईन पाहणी केली. रेल्वेमार्गाविषयी सविस्तर चर्चा केली. हा रेल्वेमार्ग लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी मी प्रयत्नशील राहील.

-खा.बजरंग सोनवणे, बीड.

पाठपुरावा करावा तो खा.सोनवणेंनी: वाघ

खा.बजरंग सोनवणे यांना लोकसभा निवडणूकीत जिल्ह्यातील सुजान नागरिकांनी निवडून दिले, याचा मतदार व जिल्ह्यातील रहिवासी म्हणून अभिमान वाटत आहे. गेल्या वर्षभराच्या आतच त्यांनी बीड रेल्वेसाठी पाठपुरावा केला. आहिल्यानगर-बीड-परळी बंद असलेली कामे चालू करुन गतीने काम पूर्णत्वास जात आहे. नवीन रेल्वेमार्गासाठी देखील त्यांनी जो पाठपुरावा केला आहे, तो कमालीचा आहे. पाठपुरावा करावा तो खा.बजरंग सोनवणे यांनीच. याच पाठपुराव्याचे हे फळ आहे, अशी प्रतिक्रिया बीड येथील नागरिक शरद वाघ यांनी दिली आहे.

# शिक्षण प्रक्रियेत ग्रंथालयाची भूमिका महत्वाची - जिल्हाधिकारी अविनाश पाठक

### स्वा.सावरकर महाविद्यालयाच्या ग्रंथालय,सभागृह इमारतीचे भूमीपूजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ मार्च**

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे, अशा शिक्षण प्रक्रियेमध्ये ग्रंथालयाचे महत्त्व अनन्य साधारण आहे असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले. येथील स्वा. सावरकर महाविद्यालयात दिनांक ११ मार्च २०२५ रोजी केंद्र सरकार पुरस्कृत प्रधानमंत्री उच्च तर शिक्षा अभियान अंतर्गत महाविद्यालय सक्षमीकरण अनुदान योजनेद्वारे महाविद्यालयाच्या ग्रंथालय व सभागृह इमारत बांधकामाच्या भूमिपूजन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र अलूरकर हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे देवगिरी प्रांत कार्यवाह धनंजय धामणे हे होते. व्यासपीठावर संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य, उपाध्यक्ष सौ. ज्योती ठाकूर यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना जिल्हाधिकारी अविनाश पाठक म्हणाले की महाविद्यालयाच्या सभागृह आणि ग्रंथालयाची इमारत होत आहे ही समाधानाची बाब आहे. सभागृहातून समाज प्रबोधन आणि ग्रंथालयातून ज्ञानार्जन होत असते. शिक्षण प्रक्रियेमध्ये ग्रंथालयाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. धनंजय धामणे या प्रसंगी बोलताना म्हणाले



की महाविद्यालय विद्यार्थ्यांसाठी या सुविधा उपलब्ध करून देत आहे. यातून प्रबोधन व्हावे, गुणवंत विद्यार्थ्यांची पिढी निर्माण व्हावी. अध्यक्षीय समारोपात डॉ. सुरेंद्र अलूरकर म्हणाले की संस्था विद्यार्थी केंद्रबिंदू म्हणून कार्य करते. विद्यार्थ्यांसाठी या सुविधा उपलब्ध होत आहेत ही आनंदाची बाब आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.रूपाली कुलकर्णी, प्रा. आसावरी राऊत यांनी केले तर आभार उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी मानले. या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे यांनी लिहिलेल्या प्लांट फिजिओलॉजी अँड मेटाबोलिझम या पुस्तकाचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला संस्थेचे पालक हरीश कुलकर्णी, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे, सावरकर संकुलाचे अध्यक्ष डॉ. पी. के. कुलकर्णी, कार्यवाह डॉ. अविनाश देशपांडे, माध्यमिक विभागाचे अध्यक्ष प्रमोद कुलकर्णी, प्राथमिक विभागाचे अध्यक्ष एस. एन. कुलकर्णी, मुख्याध्यापक विठ्ठल काळे, मुख्याध्यापिका बालिका देशमुख, संस्थेचे पदाधिकारी, सभासद,विद्यार्थी,शिक्षक प्राध्यापक, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# भारतीय बौद्ध महासभा माजलगावचे तहसिलदार मार्फत नितीश कुमार यांना निवदन

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.११ मार्च**

बिहार राज्यातील बौद्धांचे पवित्र स्थळ बुद्धगया महाबोधी विहार हे ईत्तर धर्मीयांच्या ताब्यात आसुन बुद्धगया महाबोधी विहार मुक्ती आंदोलन अनेक वर्षापासुन चालु आसुन या अंदोलनाचा एक भाग म्हणुन बुद्धगया मंदिर अधिनियम १९४९ आणी प्रशासनाचे संदर्भा नुसार अनुच्छेद १३,२५ व २६ नुसार न्याय देण्यात यावा या आशयाचे भारतीय बौद्ध महासभा राष्ट्रीय कार्याध्यक्ष आद डॉ भिमराव यशवंतराव आंबेडकर यांच्या आदेशाने व भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा बीड पुर्व यांच्या सुचने नुसार आज दिनांक १० मार्च २०२५,वार सोमवार रोजी बिहारचे मुख्यमंत्री मा.नितिश कुमार जी यांना तहसिलदार माजलगाव द्वारे बुद्ध गया महाबोधी विहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे आसे निवेदन भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा माजलगाव च्या वतीन देण्यात आले त्या प्रसंगी भारतीय बौद्ध महासभा माजलगाव तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे,महिला जिल्हा अध्यक्षा आद.कमलताई डोंगरे,जिल्हा संस्कार सचिव शामभाऊ वाघमारे,जिल्हा



पर्यटन सचिव एन बी राजभोज,जिल्हा संघटक बी सी डोंगरे,बुद्धगया महाविहार मुक्ती अंदोलन कृतिसमिती माजलगावचे अध्यक्ष आद.विजयदादा साळवे, वंचित चे नेते धम्मानंदभाऊ साळवे, भारत तांगडे,सचिन उजगरे, अंकुश आण्णा जाधव, शत्रुघ्न कसबे,शरद उजगरे,बहुजन समाज पार्टी चे जिल्हा प्रभारी,ॲड.अमोल डोंगरे,सदधम्म सेवासंघाचे अध्यक्ष सदाशिव भालेराव सर, पांडुरंग जाधव,राजकुमार सोनवने,तालुका सरचिटणीस सिद्धार्थ वक्ते, वंचित बहु, भारतीय बौद्ध महासभा शहर अध्यक्ष एल आर मस्के,संस्कार उपाध्यक्ष गुलाब धाईजे संरक्षण उपाध्यक्ष नितीन डोंगरे, पर्यटन उपाध्यक्ष चक्रधर पोटभरे,दयानंद साळवे,डी पी वाघमारे नाना, डी पी पोटभरे,पत्रकार किसन भदर्गे,पत्रकार सुभाष बोराडे,मोहन काकडे, सिद्धार्थ घडस, ॲड.बाबुलाल घनघाव, भगवान डोंगरे ,गणपत भालेराव,शोभाताई भोजने,लिलाताई उजगरे, वंदनाताई घनघाव ,मंदाताई साळवे,शारदाताई तांगडे,अनुराधाताई साळवे, मायाताई स्वामी,विशाखाताई वाघमारे, निलावती गायसमुद्रे ,केशरताई तरकसे, गिरजाबाई पोहरे कोमल डोंगरे,सह भारतीय बौद्ध महासभा माजलगाव चे पदाधिकारी उपस्थित होते.

# तुकुचीवाडीचा पुत्र ठरला मुंगूसवाडे केसरी किताबावा मानकरी




**तभा वृत्तसेवा**
**केज दि.११ मार्च**

मुंगूसवाडे जिल्हा अहिल्यानगर येथे कुस्ती स्पर्धेत तुकचीवाडी ता केज चा पैलवान नारायण उत्तरेश्वर चौरे हा अहिल्यानगर येथे झालेल्या मुंगुसवाडी केशरी नंतर त्याच्या जन्मभूमी येथे आलासता सत्कार सन्मान करण्यात आला या वेळी गावचे युवा नेते भागवत चौरे(दादा) सत्कार व कौतुक करून त्यांनी गावातील तरूण युवकांना आई वडीलांच्या कष्टाचा परतफेड करायाची असेल तर कठोर परिश्रम मेहनत करून जीवनाच्या मार्गावर यशस्वी वाटचाल करावी व मायबापाच्या कष्टाची ग्वाही यशामध्ये रूपांतरीत होऊन द्या हीच अपेक्षा शेवटी आपआपल्या आई वडिलांची असते असे मार्गदर्शन केले यावेळी तुकूचीवाडी जिवाचीवाडी येथील तरूण कुस्ती प्रेमी व कुस्ती पटू व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्यांचे कौतुक केले

# माजलगावात प.पु.जयशेखर मुनी यांच्या सानिध्यात 'जैन होळी चातुर्मास'

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.११ मार्च**

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी माजलगावात जैन परंपरेने होणारा होळी चातुर्मास दि.१३ मार्च २०२५ रोजी येथील श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ यांच्या वतीने येथील राजस्थानी मंगल कार्यालयामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांसह होळी चातुर्मास संपन्न होईल.



यावर्षी या होळी चातुर्मासाच्या निमित्ताने जैन मुनी आचार्य प्रवर पार्श्वचंद्र म.सा. चे आज्ञाधारक, प्रवचन प्रभावक मुनी डॉ.पद्मचंद्र म.सा. यांचे सुशिष्य सेवाभावी साधू जयशेखर मुनी म.सा. व मधुर व्याख्याता डॉ.जयघोष मुनी म.सा. आदी ठाणा २ यांच्या पावन सानिध्यात गुरुवार दि.१३ मार्च २०२५ रोजी सकाळी ८.३० ते १०.०० वाजेपर्यंत धार्मिक जाप व तसेच सकाळी १०.०० ते ११.०० ज्ञानाच्या अमृत वाणीने मधुर असे प्रवचन होणार असून सर्वधर्मीय भाविक-भक्तांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा व प्रवचन वेळी भरपूर संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ माजलगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे.




माजलगाव तालुक्यातील सुलतानपूर येथील शेतकरी सौ वर्षा अशोक नरवडे यांनी पुरुषोत्तमपुरी ३३ के.व्ही. उपकेंद्रासाठी ६० आर बागायती जमिन दान दिल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना शिवाजी वाडेकर कार्यकारी अभियंता स्थापत्य विभाग बीड, उपकार्यकारी अभियंता मन्मथ स्वामी साहेब विजयकुमार गायके, सब रजिस्टर बि.डी.दारेवार कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत्त (अण्णा) नरवडे उपसभापती श्रीहरी (नाना) मोरे

# युवती सबलीकरण हेच भा.शि.प्र.च्या प्रत्येक संस्कार केंद्राचे ध्येय-ज्योती दिपकसिंह ठाकूर

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.११ मार्च**

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या संस्कार केंद्रात शिक्षण घेणाऱ्या युवती या सबल आणि सक्षम झाल्या पाहिजेत हेच आमचे ध्येय असून त्यानुसार आमची वाटचाल सुरू आहे असे मत संस्थेच्या उपाध्यक्षा ज्योती दीपकसिंह ठाकूर यांनी व्यक्त केले.



राष्ट्रीय सेवा योजना विभाग व अंतर्गत तक्रार निवारण समिती आयोजित असंघटित क्षेत्रातील महिला कामगारांचा सन्मान सोहळा सिद्धेश्वर महाविद्यालयात आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर, प्रकाश दुगड, अमरनाथ खुर्पे, सुरेंद्र रेदासनी, विश्वास जोशी, अभय कोकड, प्राचार्य मुकुंद देवर्षी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना संस्थेच्या उपाध्यक्षा ज्योती ठाकूर म्हणाल्या की,समाजात वावरताना युवती आणि महिलांना प्रोत्साहन हे मिळाले पाहिजे. जसे एका यशस्वी पुरुषांच्या मागे एक स्त्री असते तसेच एका यशस्वी स्त्री च्या मागे एक पुरुष देखील असतो, युवती या सबल आणि आपल्या पायावर उभा राहण्यासाठी समाजाने मुलींना प्रोत्साहन दिले पाहिजे. अध्यक्षीय समारोपात सुरेंद्र आलूरकर यांनी महिला सक्षमीकरण करणे हे या शिक्षण संस्थेच्या संस्कार केंद्राचे ध्येय आहे असे मत व्यक्त केले. अमरनाथ खुर्पे म्हणाले की, भा.शि.प्र.ची संस्कृती पूर्वीपासूनच ज्या ज्या वेळी समाजा ची गरज वाटेल तेव्हा तेव्हा संस्थेने समाजातील गरजू आणि उपेक्षित लोकांना मदत केली आहे. ऍड. विश्वास जोशी म्हणाले की, समाजातील असंघटित महिलांना एकत्रित करण्याची सिद्धेश्वर महाविद्यालयाने जी संकल्पना राबवली आहे ते खरोखरच वाखण्याजोगी आहे. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी यांनी केले. महिला कामगारांच्या वतीने गीता शेळके यांनी मनोगत केले. सूत्रसंचालन प्रा.डॉ. साधना घडसिंग यांनी केले. या कार्यक्रमाचे संयोजन रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ. विकास बोरगावकर व विशाखा समितीच्या डॉ. साधना घडसिंग, प्रा. प्रतिभा जाधव, सौ. स्वाती धर्माधिकारी, प्रा. स्वाती साखरे, प्रा. मनीषा सरकटे, सौ. आशा कांबळे यांनी केले. कार्यक्रमासाठी बहुसंख्य महिलांची उपस्थिती होती.

# मराठवाडा जनता विकास परिषद अध्यक्षपदी दिलीप खिस्ती

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ मार्च**

मराठवाडा जनता विकास परिषदेची बैठक बीड येथे संपन्न झाली. यामध्ये मराठवाडा जनता विकास परिषदेची कार्यकारिणी निवडण्यात आली.



अध्यक्षपदी दिलीप खिस्ती, सचिव म्हणून अतुल कुलकर्णी, कोषाध्यक्ष म्हणून कल्याण कुलकर्णी यांची निवड करण्यात आली. सदस्य म्हणून श्री.राजेंद्र आगवान, सर्वोत्तम गावरस्कर, मंगेश निटूरकर, विनय आगवान, राजेंद्र होळकर, सुभाष चौरे, अविनाश वाघीरकर व सौ.मनिषा शंकर शितोळे (महिला प्रतिनिधी) यांची निवड करण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष श्री.राजेंद्र आगवान हे होते.